cmyk

## संपादकीय

### बथ्थड व्यवस्थेचे बळी!

आपल्या महाशक्ती वा विश्वगुरू बनण्याचे स्वप्न उरात बाळगणा–या देशात एकाच आठवड्यात तीन घटना घडल्या! पहिली घटना प्रगत व पुढारलेले राज्य म्हणून मिरवणा–या महाराष्ट्र राज्यातील डोंबिवलीच्या केमिकल फॅक्टरीतील भयंकर स्फोटाची! या घटनेत किमान १३ कामगारांचा अक्षरश: कोळसा झाला. एवढा की, मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी 'डीएनए' चाचणीचा आधार घेण्याची वेळ आली. या घटनेतील अजूनही काही कामगार बेपत्ता आहेत व अद्याप त्यांचा शोध लागलेला नाही.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### चीन बांधतोय पाकसाठी स्टीलचे बंकर

नवी दिल्ली : पाकव्याप्त काश्मीरमध्ये लष्करी मदत वाढवून चीन आपल्या नापाक मनसुब्यांना खतपाणी घालत आहे. भारतासोबतच्या सीमावादाच्या पार्श्वभूमीवर चीन प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी लष्करासाठी स्टीलचे बंकर बांधत आहे. ते पाकिस्तानी लष्कराला मानवरहित लढाऊ विमाने आणि इतर उपकरणेही पुरवत आहे. चीनच्या मदतीने सीमेवर शक्तिशाली कम्युनिकेशन टॉवर बसवले जात आहेत. भूमिगत फायबर केबल टाकण्याचे कामही जोरात सुरू आहे. लष्करी अधिका–यांनी दिलेल्या माहितीनुसार, चिनी प्रगत रडार यंत्रणाही बसवण्यात आली आहे. या रडारमुळे कमी उंचीवरील लक्ष्य शोधण्याची पाकिस्तानी लष्कराची क्षमता वाढेल.


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–५० | शुक्रवार दि.३१ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


# मोदी सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी केले

## » डॉ.मनमोहन सिंग यांची मोदींवर टीका!



**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी विद्यमान नरेंद्र मोदी सरकारची मागील १० वर्षातील कामगिरी निराशजनक राहिल्याचं मत व्यक्त केलं. तसेच केंद्र सरकारच्या शेती धोरणांवरूनही डॉ.सिंग यांनी नाराजी व्यक्त केली आहे. शेतकरी आंदोलन, दुप्पट उत्पन्न यावरही टिपणी केली. लोकसभा निवडणुकांच्या शेवटच्या टप्प्यासाठी १ जून रोजी मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. सिंग यांनी पंजाबच्या नागरिकांना पत्र लिहिलं आहे. या पत्रात देशातील लोकशाही, संविधान सुरक्षित ठेवण्यासाठी निरंकुश सत्ताधाऱ्यांना पायउतार करण्याचं आवाहन डॉ. सिंग यांनी मतदारांना केलं आहे.**

डॉ. सिंग यांनी तीन कृषी कायद्याच्या विरोधात शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाबद्दल पत्रात भाष्य केलं आहे. त्यासोबतच भाजपने शेतकऱ्यांची बदनामी केल्याचा आरोपही सिंग यांनी केला आहे. डॉ. सिंग लिहिले , ''पंजाबमधील शेतकरी तीन कृषी कायद्यांना विरोध करत होते. त्यासाठी दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करत होते. परंतु तरीही भाजप सरकारने शेतकऱ्यांशी चर्चा केली नाही. उलट मागच्या दहा वर्षात पंजाब आणि पंजाबियतला बदनाम करणीयचा एकही संधी भाजपने सोडली नाही. शेतकऱ्यांवर लाठीमार आणि रबरी गोळ्या चालवून सरकारचे समाधान झाले नाही. म्हणून संसदेत शेतकऱ्यांना 'आंदोलनजीवी' आणि 'परजीवी' असं संबोधलं गेलं. दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करणारे ७५० शेतकरी आंदोलनात शहिद झाले. त्यांची मागणी फक्त एवढीच होती की, कृषी कायदे त्यांच्या लादू नका.'' असंही डॉ सिंग यांनी लिहिलं आहे. डॉ. सिंग यांनी पुढे लिहिले की, ''मोदीजींनी २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचा आश्वासन दिले होते. परंतु मागील १० वर्षात केंद्र सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी केले आहे.'' या पत्रात खत आणि इंधनासह कृषी निविष्ठाच्या किमतीतील वाढ आणि आयात–निर्यात धोरणावरही नाराजी व्यक्त केली. तसेच युपीए सरकारने देशातील ३.७३ कोटी शेतकऱ्यांचं ७२ हजार रुपये कर्जमाफ केल्याचंही सांगत हमीभावातील वाढ, उत्पादनातील वाढ आणि निर्यात धोरणांना दिलेलं प्रोत्साहन यावरही टिपणी केली. दरम्यान, काँग्रेसनं जाहीरनाम्यात शेतकऱ्यांसाठी 'किसान न्याय' अंतर्गत शेतकऱ्यांना ५ प्रकारची हमी देण्यात आली आहे. नरेंद्र मोदींनी पंतप्रधान पदाची प्रतिष्ठा घालवली, अशी टीका या पत्रात डॉ सिंग यांनी केली.

# नवीन सरकार येईपर्यंत आचारसंहिता कायम

### दुष्काळग्रस्तांना मदत कशी करणार? राज्य सरकारपुढे प्रश्न

**मुंबई । प्रतिनिधी**

जोपर्यंत नवीन लोकसभा स्थापन होत नाही तोपर्यंत आचारसंहितेमध्ये शिथिलता दिली जाणार नाही अशी महत्वपूर्ण माहिती राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे. ४ जून रोजी मतमोजणी झाल्यानंतर लोकसभा स्थापन होईल आणि त्यानंतर आचारसंहितेमध्ये शिथिलता दिली जाईल असं आयोगाने स्पष्ट केलं आहे. त्यामुळे अत्यावश्यक काही घोषणा किंवा निर्णय राज्य सरकारला



घ्यायचे असल्यास निवडणूक आयोगाची परवानगी घेण बंधनकारक राहणार आहे. आयोगाच्या या निर्णयामुळे राज्यातील दुष्काळग्रस्तांना मदत कशी करणार असा प्रश्न आता राज्य सरकारसमोर आहे.

देशात सात टप्प्यात मतदान होत असून सातव्या म्हणजे ◀◀ पान २ वर

## राहुल गांधींना पुणे सत्र न्यायालयात हजर राहण्याचे आदेश

### स्वा.सावरकरांविरोधात केलेले वक्तव्य भोवणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत लंडनमध्ये केलेलं वक्तव्य काँग्रेस नेते राहुल गांधी यांना भोवण्याची शक्यता आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर बदनामी प्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधींना १९ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष न्यायालयात हजर राहण्याचे आदेश पुण्यातील सत्र न्यायालयाने दिले आहेत. कलम २०४ अन्वये हे आदेश देण्यात आले आहेत. राहुल गांधींनी मार्च २०२३ मध्ये लंडन येथील भाषणात केलेल्या वक्तव्यांच्या विरोधात त्यांच्या विरोधात हा खटला दाखल करण्यात आला होता. आता राहुल गांधी न्यायालयाच्या या आदेशानंतर





स्वत: उपस्थित राहतात की वकिलामार्फत बाजू मांडतात हे पहावं लागेल.

सावरकरांचा अपमान केल्याचा राहुल गांधींवर आरोप

राहुल गांधी यांनी लंडन येथील भारतीय लोकांसमोर भाषण करताना स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान केल्याचा आरोप आहे. पुणे पोलिसांनी याबाबतचा रिपोर्ट न्यायालयात दाखल केला आहे. राहुल गांधी यांच्या वक्तव्याबाबत सावरकरांचे ◀◀ पान २ वर

## सुप्रिया सुळे यांची शेतकरी आणि हिंजवडी आयटी पार्कवरून सरकारवर कडाडून टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

**एकीकडे राज्यातील शेतकरी नैसर्गिक आपत्ती आणि इतर कारणांमुळे अडचणीत आला आहे. तर दुसरीकडे हिंजवडी आयटी पार्कमधील आयटी कंपन्या राज्याबाहेर जाण्याच्या मार्गावर आहेत. यावरून ''सरकारला याबाबतीत लक्ष घालायला वेळ नाही'', अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी गुरूवारी (ता.३०) समाजमाध्यतून केली. तसेच ''राज्यातील महायुती सरकार शेती आणि शेतकरी विरोधी असून रोजगाराच्या मुद्द्यावर सरकार कोणतं पाऊल उचलतंय? असा सवाल करत सरकारवर निशाणा साधला आहे.**



'गेल्या काही दिवसापासून राज्याच्या विविध भागात कडकडीत ऊन आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस होत आहे. यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. शेतीसह आर्थिक नुकसान झाल्याने हतबल झाला आहे. मात्र महायुती सरकारला किंचितही घेणं देणं नाही'', असे सुळे यांनी म्हटले आहे. सुळे म्हणाल्या, ''हे सरकार शेती आणि शेतकरी विरोधी सरकार आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव नाही. खते, बियाण्यांच्या किंमती आस्मानाला भिडल्या आहेत. मात्र शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी किंचितही उपाययोजना करण्यास सरकार तयार नाही''. ''उलट सिंचनासाठी लागणाऱ्या पाण्यावरील पाणीपट्टी तब्बल दहा पटीने वाढवली जात आहे. शिवाय कृषीपंपांना देखील मीटर बसवले जाणार आहेत. ही शेतकऱ्यांची लूट असून आम्ही सर्वजण याचा तीव्र शब्दांत निषेध करतो'', असेही सुळे म्हणाल्या. नैसर्गिक आपत्ती आणि इतर कारणांमुळे ◀◀ पान २ वर

## जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात आंदोलन तीव्र!

**पुणे । प्रतिनिधी**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, 'एससीईआरटी'ने राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीमधील काही श्लोकांचा समावेश करण्याचा प्रस्ताव मांडल्याच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी बुधवारी महाड येथे चवदार तळ्याजवळ आंदोलन केले. या आंदोलनावेळी आव्हाडांकडून मनुस्मृती ग्रंथाचे दहन करण्यात आले. परंतु यावेळी आव्हाड आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेले पोस्टरही फाडण्यात आल्याने भाजप आक्रमक झाली आहे.**

आव्हाड यांनी माफी मागितली असली तरी आज भाजप आणि अजित पवार गटातर्फे आंदोलन करण्यात येत आहे. आव्हाड यांच्या विरोधात या प्रकरणी मुंबई, पुणे, संगमनेर, धुळे या ठिकाणी गुन्हे दाखल झाले आहेत. जितेंद्र आव्हाड यांच्यावर कारवाईची मागणी केली जात आहे. पुण्यात बंडगार्डन पोलिस ठाण्यात जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी भीमराव बबन साठे यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर संगमनेर येथील पोलिस ठाण्यात देखील आव्हाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम ५०४ अन्वये शांततेचा भंग करण्याच्या हेतूने अपमान केल्याप्रकरणी आव्हाड यांच्याविरुद्ध ◀◀ पान २ वर

## धाकधुक वाढली: निकालासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

### ६ विधानसभानिहाय होणार ४ जुनला मतमोजणी



**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत बीड मतदारसंघात यंदा चांगलीच चुरस पाहायला मिळाली. महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडेंसाठी एकतर्फी वाटणारी निवडणूक शेवटच्या टप्प्यात अटीतटीची बनली होती. या मतदारसंघात जातीय तेढ पाहाला मिळालं. त्यामुळे, निवडणूक मतदानातही जातीय आधारावर मतांची विभागणी झाल्याचं येथील जाणकार सांगतात. तर, महायुतीच्या उमेदवारासाठी दबावतंत्र वापरुन मतदारसंघात बोगस मतदान झाल्याचा आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी केला होता. तसेच, मतमोजणी प्रक्रियेत जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना सहभागी न होऊ देण्याची मागणीही त्यांनी केली होती. आता, जिल्हाधिकारी दीपा मुधोळ–मुंडे यांनी निवडणूक मतमोजणीची तयारी केली असून आज यासंदर्भाने आढावा घेतला.

जातीय संघर्षातून मोठी चर्चा ठरलेली बीड लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणी प्रक्रियाची सध्या युद्धपातळीवर तयारी सुरू आहे. बीड जिल्ह्यातील केवळ उमेदवारावरच आरोप प्रत्यारोप ◀◀ पान २ वर

### कोण होणार खासदार

बीड लोकसभा मतदारसंघात यंदा पंकजा मुंडे विरुद्ध बजरंग सोनवणे अशी लढत झाली. येथील निवडणुकीत यंदा मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष पाहायला मिळाला. उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांचा मूळ जिल्हा असल्याने आणि मराठा आरक्षणाचे केंद्र बनल्याने मराठा समाज एकटवल्याचं दिसून आलं. त्यामुळे, जातीय समीकरणावर येथील निवडणूक पार पडल्याने यंदा विजयी कोण होणार याची उत्कंठा सर्वांनाच लागली आहे.

## आशिष शेलार शिवतीर्थवर, राज ठाकरेंची भेट

### कोकण आणि मुंबई पदवीधर मतदारसंघाबाबत निर्णय काय?

**मुंबई । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकांच्या प्रचाराची सांगत झाल्यानंतर विधानपरिषद निवडणुकांची घोषणा झाली आहे. त्यामुळे, निवडणुकांमधील आरोप–प्रत्यारोप, राजी–नाराजीपासून काही वेळासाठी दूर झालेली राजकीय मंडळी पुन्हा विधानपरिषद निवडणुकांसाठी सज्ज झाली. त्यामुळे, पुन्हा एकदा महायुती व महाविकास आघाडीतील शीतयुद्ध समोर आल्याचं दिसून आलं. त्यातच, भाजप महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या मनसेकडून विधानपरिषद निवडणुकीसाठी आपला उमेदवार जाहीर करण्यात आला. मनसेनं अभिजीत पानसे यांना कोकण पदवीधर मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केल्यामुळे महायुतीत पुन्हा वादंग होतं की काय, असा प्रश्न निर्माण झाला होता. त्यातच, मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली आहे.**



विधानपरिषदेच्या ४ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून २६ जून रोजी मतदान होत आहे. तर, १ जुलै रोजी निवडणूक निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे, महायुती व महाविकास आघाडीतील सर्वच पक्ष निवडणुकीसाठी कामाला लागले आहेत. त्यातच, मनसेनं अभिजीत पानसे यांना कोकण पदवीधर मतदारसंघातून उमेदवारी ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :१.५० क्विंटल | २,२५० | २,३०० | २,२७५ |
| ज्वारी/हायब्रिड :७९.५० क्विंटल | २,०११ | ३,१७१ | २,४९३ |
| मूग : १.५० क्विंटल | ५,००१ | ७,१०० | ६,०५० |
| तूर : २३.०० क्विंटल | ११,६५१ | १२,१५० | ११,९५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: ३०.०० क्विंटल | २,२५१ | २,६८० | २,४५७ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन:३२.०० क्विंटल | ४,४२० | ४,४८० | ४,४६३ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |

# बीड जिल्ह्याच्या तीव्र पाणी टंचाईवर आणि जनावरांच्या चाऱ्याची जिल्हाधिकारी यांनी तातडीने उपाय योजना कराव्यात–जगताप, मुळूक

### शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड, प्रतिनिधी – बीड जिल्ह्यातील सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी कायम पुढाकार घेणारे बीड शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी बीड जिल्ह्यातील तीव्र पाणी टंचाईवर आणि जनावरांच्या चाऱ्याची जिल्हाधिकार्यांनी तातडीने उपाय योजना कराव्यात यासाठी आज दि. ३० में रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान बीड जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांना निवेदन दिले. याबरोबरच सध्या बीड जिल्ह्यात सर्व सामान्य जनतेला पाणी टंचाई तथा जनावरांच्या चाऱ्यासाठी करावी लागत असलेल्या भटकंती बाबत अडचणी मांडल्या. याबरोबरच पाणी टंचाई आणि जनावरांच्या चाऱ्यासाठी काय उपाययोजना करण्यात येतील आणि तातडीने या गंभीर प्रश्नाचे कसे निवारण करता येईल याबाबत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्याशी चर्चा केली. चर्चेनंतर जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी शिवसेनेच्या वतीने अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी दिलेल्या निवेदनातील मागण्यावर प्रशासनाकडून गंभीर्याने दखल घेण्यात येळ आणि सामान्य जनतेला होत असलेल्या पाणी टंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याची तातडीने व्यवस्था करेल असे सांगितले. सध्या टँकर गावागावात टँकर व्यवस्था सुरु असून गावागावात होणाऱ्या टँकरच्या खेपा याची तपासणी सुरु असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप तथा सचिन मुळूक यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात असे म्हंटले की, बीड शहरासह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. बीड शहरात २० ते २२ दिवसाला पाणी येत असल्याने पाणी वितरण प्रणालीत सुधारणा करणे आवश्यक आहे. बीड शहरातील पाणी पुरवठा हा किमान आठ दिवसाला करण्यात यावा. या बाबत नगर परिषद प्रशासनाला तातडीने सूचना देण्यात याव्यात व ग्रामीण भागातील टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा. या बाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी. ग्रामीण भागात पाणी टंचाई दुर करण्यासाठी इंधन विहिरी घेणे आवश्यक आहे. परंतु इंधन विहिरींचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. पण वरिष्ठ व कनिष्ठ भुवैज्ञानिक यांच्या जागा रिक्त असल्यामुळे इंधन विहिरींचे सर्वेक्षण होत नाही. बीड जिल्ह्यातील प्रकल्पातील बुडित क्षेत्रात एम.आर.ई.जी.एस. अंतर्गत पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या करीता तातडीने विहिरी सुरु करण्यात





याव्यात. या करीता पंचायत समिती प्रशासनाला सुचना देण्यात याव्यात. तरी वरील सर्व बाबीवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती आहे. याबरोबरच बीड जिल्ह्यातही सध्या तीव्र पाणी टंचाई सुरु असून शासना मार्फत टंचाई ग्रस्त गावांना टँकर द्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असून मंजूर टँकरची संख्या व टँकर द्वारे करण्यात येणार्या खेपा यात मोठ्या प्रमाणात तफावत आहे. टँकर मंजूर असलेली संख्या व मंजूर खेपा गाव निहाय टाकण्यात येत नाहीत. जी.पी.एस. प्रणाली टँकरला बसविण्यात आलेली नाही. त्यामुळे टँकरचे लोकेशन मिळत नाही. यामुळे पाणी पुरवठा करण्यात मोठ्या प्रमाणात गैर व्यवस्थापन निर्माण झालेले आहे. यामुळे नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. गावागावात पाणीपुरवठा करण्यासाठी जाणाऱ्या ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# बथ्थड व्यवस्थेचे बळी!

आपल्या महाशक्ती वा विश्वगुरू बनण्याचे स्वप्न उरात बाळगणा-या देशात एकाच आठवड्यात तीन घटना घडल्या! पहिली घटना प्रगत व पुढारलेले राज्य म्हणून मिरवणा-या महाराष्ट्र राज्यातील डोंबिवलीच्या केमिकल फॅक्टरीतील भयंकर स्फोटाची! या घटनेत किमान १३ कामगारांचा अक्षरश: कोळसा झाला. एवढा की, मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी 'डीएनए' चाचणीचा आधार घेण्याची वेळ आली. या घटनेतील अजूनही काही कामगार बेपत्ता आहेत व अद्याप त्यांचा शोध लागलेला नाही. दुसरी घटना घडली ती पंतप्रधान व गृहमंत्री यांचे गृहराज्य असणा-या गुजरात राज्यातील राजकोटमध्ये. राजकोटमध्ये उभारण्यात आलेल्या गेमिंग झोनमध्ये आग लागली आणि या गेमिंग झोनचा 'डेथ झोन' झाला! या घटनेत २७ जणांचा मृत्यू झाला. ज्यात काही निष्पाप लहान मुलांचाही समावेश आहे.

तिसरी घटना देशाची राजधानी असलेल्या नवी दिल्लीत घडली. राजधानी दिल्लीच्या विवेक विहार भागातील एका खासगी बाल रुग्णालयास आग लागून सात नवजात बालकांचा मृत्यू झाला. या देशाच्या तीन वेगवेगळ्या भागात घडलेल्या तीन वेगवगळ्या घटना असल्या तरी त्यात एक साम्य नक्कीच आहे ते म्हणजे या तीनही घटनांत सुरक्षेचे उपाय व त्याची अंमलबजावणी हा विषय पूर्णपणे धाब्यावर बसवण्यात आला व ज्या सरकारी यंत्रणेवर याकडे डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवण्याची जबाबदारी आहे त्या यंत्रणेने आपले डोळेच मिटून घेतले होते.

म्हणजे डोंबिवलीतील घटनेनंतर यंत्रणा सांगते की, ज्या कंपनीत स्फोट झाला त्या कंपनीने बॉयलर वापराची परवानगीच घेतली नव्हती. तर राजकोटमध्ये ज्या गेमिंग झोनमध्ये आग लागली त्या गेमिंग झोनने ते चालू करताना रीतसर परवाना काढला नव्हता की, महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून ना हरकत दाखला घेण्याची तसदी उचलली होती. राजधानीत आग लागलेल्या खासगी बाल रुग्णालयानेही अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नव्हते. एवढेच काय पण या रुग्णालयाच्या परवान्याची मुदत संपलेली असतानाही परवान्याचे नूतनीकरण न करताच ते सुरू ठेवण्यात आले होते आणि विशेष म्हणजे हे रुग्णालय एक बीएएमएस डॉक्टर चालवत होता. त्याला असे रुग्णालय चालविण्याचा अधिकार आहे की नाही? याची खातरजमाच आपल्या 'कार्यक्षम' यंत्रणेने केलेली नाही. थोडक्यात सार काय तर वरवर पाहता या तीनही घटना अपघात वाटत असल्या तरी त्यामागच्या प्रमुख कारणाचे एकच समान सूत्र आहे ते म्हणजे आपल्या यंत्रणेचा व व्यवस्थेचा बथ्थडपणा! नियम पाळण्यासाठी नव्हे तर ते मोडण्यासाठीच किंवा त्यात पळवाटा काढण्यासाठीच असतात, लाचखोरी करून भ्रष्ट यंत्रणेला आरामात खिशात घालता येते ही वृत्ती आपल्या बथ्थड व्यवस्थेत इतकी दृढ झाली आहे की, आताशा कोणाला त्याचे काही वाटेनासे झाले आहे!

जोवर दुर्घटना होत नाही तोवर सुरक्षा उपायांची पूर्तता व त्याची आवश्यक व नियमित तपासणी यावर साधी चर्चाही होत नाही आणि म्हणूनच या व अशा देशात घडणा-या असंख्य अपघातातील बळी हे अपघाताचे नव्हे तर आपल्या असंवेदनशील व बथ्थड बनलेल्या व्यवस्थेचे बळी आहेत. त्यामुळेच असे अपघात घडले की, काही काळ गरमागरम चर्चा होते. तोवर चौकशी समिती, दोषींवर कडक कारवाई, वगैरेच्या घोषणा होतात आणि एकदा का प्रकरण थंडबस्त्यात गेले की, सगळे काही थंडगार होते ते पुढची दुर्घटना होईपर्यंत! १३ जून १९९७ रोजी राजधानी

दिल्लीतील 'उपहार' चित्रपटगृहाला आग लागून ६० जणांचा कोळसा झाला होता. तेव्हापासून आजवर देशात जेवढ्या केवढ्या अशा अपघातांच्या घटना घडल्या त्यावेळी अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी युद्धपातळीवर कडक उपाययोजना करण्याच्या चर्चा व घोषणा झाल्या. मात्र, ना देशातले असे अपघात थांबले, ना त्यांची संख्या रोडावली. उलट उपहार अग्नीकांडातील आरोपी अन्सल बंधूंच्या निर्दोष मुक्ततेने अशा नियम, कायदे सर्रास पायदळी तुडवण्याच्या मनोवृत्तीला एवढे बळ दिले की, आज ही दृढ मनोवृत्ती हीच समाजासाठीची सर्वांत मोठी समस्या बनलेली आहे.

आपल्याकडे नियम, कायदे, विविध प्रकारच्या सुरक्षेचे मापदंड, त्याबाबतची मानके हे सगळे कागदी अलंकारच आहेत हेच देशात वारंवार घडणा-या अशा घटनांमध्ये सप्रमाण सिद्ध होते. अशा घटना-अपघातानंतर त्यामागे यंत्रणांच्या निष्क्रियतेचे, बेमुर्वतखोरपणाचे, भ्रष्टाचाराचे, बेफिकिरीचे पुरावे बाहेर येतात. नियम मोडणारे वा त्यात पळवाटा शोधणा-यांना यंत्रणेचे केवळ अभयच नाही तर अर्थपूर्ण सा हे ही उघडकीस येते. दोषींवर अत्यंत कडक कारवाईच्या घोषणा होतात पण अगदी अपवादानेही कुठल्या दोषीला त्याच्या कृत्याची शिक्षा मिळाल्याचे पहायला मिळत नाहीच! विशेष म्हणजे त्याचे आपल्या कुणाला काही वाईट वगैरे वाटत नाही की, दोषींना शिक्षा झालीच पाहिजे यासाठी कुणी आग्रह वगैरे धरत नाही, रस्त्यावर उतरत नाही, आंदोलन करत नाही, बंदच काय पण साधा दुखवटाही पाळत नाही. व्यवस्थेचा हाच बथ्थडपणा, असंवेदनशीलता अशा अपघातांमध्ये बळी पडणा-या निष्पापांच्या प्राणहानीचे प्रमुख कारण आहे.

व्यवस्थेचा हा बथ्थडपणा जोवर दूर होणार नाही तोवर यंत्रणांमधील भ्रष्टाचार, बेफिकिरी, बेमुर्वतखोरपणा दूर होण्याची अजिबात शक्यता नाही. जोवर यंत्रणा जबाबदार व कार्यक्षम होत नाहीत तोवर यंत्रणांना हात ओले करून सहज खिशात घालता येते ही समाजात दृढ झालेली मनोवृत्तीही बदलणे केवळ अशक्यच! पुण्याच्या कल्याणीनगर भागात बड्या बापाच्या बिघडलेल्या बाळाने दारू ढोसून बेदरकारपणे गाडी चालवत दोन तरुणांचा घेतलेला जीव व त्यानंतर या 'बाळाला' वाचविण्यासाठी युद्धपातळीवर कामाला लागलेली यंत्रणा यांचे किळस आणणारे जे किस्से उघडकीस येतायत ते आपल्या बथ्थड व्यवस्थेची लक्तरे जगाच्या वेशीवर टांगणारेच आहेत! हे सगळे प्रकार पाहिल्यावर कोणी कितीही कायदा व सुव्यवस्थेच्या बाता मारल्या तरी आपला देश 'रामभरोसे'च चालला असल्याची भावना सर्वसामान्यांच्या मनात दृढ झाल्याशिवाय रहात नाही, हे मात्र निश्चित!

---

## शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीच्या विचारधारेचा समाविष्ट करण्यास विरोध

### केज तालुका जिजाऊ ब्रिगेडचे तहसील कार्यालयाकडे निवेदन

**केज । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाच्या शाळांमध्ये मनुस्मृति आणि रामदास स्वामींच्या दासबोध या ग्रंथातील श्लोकांचा समावेश करण्यात आल्याची बातमी महाराष्ट्रभर पसरली आहे. या निर्णयाला विरोध म्हणून केज तालुका जिजाऊ ब्रिगेडने शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीला विरोध करणारे निवेदन बीड जिल्हा अध्यक्षा राधाताई रामदास सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली केज येथे तहसील कार्यालयातील पेशकार नन्नवरे यांना निवेदन दिले.**

मनुस्मृति हा हिंदू धर्मातील समस्त बहुजन समाजांचा अपमान करणारा आणि त्यांना हीन लेखनारा ग्रंथ आहे. तसेच मनुस्मृतीने हिंदु धर्मातील समस्त स्त्रियांना जनावरापेक्षाही खालचा दर्जा दिलेला असून स्त्रियांना सर्व प्रकारचे हक्क आणि अधिकार नाकारले आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज यांना सुद्धा मनुस्मृतीचा आधार घेऊनच प्रचंड, विरोध झालेला आहे. सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या शैक्षणिक कार्यालासुद्धा मनुस्मृतीचा आधार घेऊनच प्रतिगाम्यांनी विरोध केलेला होता. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा आशीर्वाद घेऊन रायगडाच्या पायथ्याशी महाडला मनुस्मृतीचे जाहीर दहन केले होते. अशा विषमतावादी ग्रंथातील श्लोक विद्यार्थ्यांना शिकवून त्यांच्या मनात जातीयवाद आणि विषमता सरकारला निर्माण करायची आहे का? असा प्रश्न जिजाऊ ब्रिगेडच्या महिलांनी या निवेदनाद्वारे शासनाकडे विचारला आहे. तसेच रामदास स्वामीचा 'दासबोध' हा ग्रंथसुद्धा विषमता निर्माण करणारा असून त्या ग्रंथामध्ये गुरूंची लक्षणे' या अध्यायात बहुजन समाजाला अध्ययन आणि अध्यापन करण्याचा अधिकार नाकारलेला आहे, त्यामुळे जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने या दोन्ही ग्रथांचा अभ्यासक्रमात समावेश करण्याला जाहीर विरोध करण्यात येत आहे. तुकोबांची अभंगगाथा, राष्ट्रसंतांची ग्रामगीता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले साहित्य अभ्यासक्रमात समाविष्ट करावे अशी मागणी निवेदनात केली आहे. सरकारने आमच्या मागणीचा ताबडतोब विचार करुन अभ्यासक्रमातून मनुस्मृती आणि दासबोध ताबडतोब हटवावे. अन्यथा जिजाऊ ब्रिगेडला शिक्षण विभागावर मोर्चा नेऊन संपूर्ण महाराषट्रभर तीव्र आंदोलन उभे करेल, असा ईशाराही बीड जिल्हा जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने देण्यात आला आहे. याप्रसंगी जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्हाध्यक्ष राधाताई रामदास सपकाळ ,अविधा बाळासाहेब शिंदे , आम्रपाली संजय सोनवणे, यांच्यासह इतर माता-भगिनी उपस्थित होत्या.

---

## शेतकऱ्यांसाठी तक्रार निवारण कक्षांची स्थापना

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वर्ष २०२४-२५ मध्ये कृषि निविष्ठा वियाणे, खते व किटकनाशके योग्य दर्जाचे, योग्य वेळी व योग्य किमतीत मिळण्याच्या दृष्टीने तसेच तालुका निहाय पुरवठा होणा-या निविष्ठांची विक्री सुरळीतपणे होण्यासाठी कृषि निविष्ठा तक्रार निवारण कक्षांची स्थापना करण्यात आली आहे.**

कृषि निविष्ठा कक्ष हा खरीप हंगामसाठी दिनांक १५ मे ते दिनांक १५ ऑगस्ट व रब्बी हंगामासाठी दिनांक १५ सप्टेंबर ते दिनांक नोव्हेंबर या कालावधी आपल्याकडील मुळ पदभार सांभाळुन आदेशान्वये देण्यात आलेले काम नियमीत पार पाडण्याचे सांगीतले आहे. तक्रार निवारण कक्षात तक्रार निवारणा-या नोंदणीसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी. शेतक-यांकडुन तक्रारी प्राप्त होताच नोंदवही मध्ये तक्रारदार शेतक-यांचे नावे, तक्रारीच स्वरूपात तक्रार प्राप्त दिनांक, वेळ संपुर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक इ.असणे आवश्यक आहे. तक्रार प्राप्त होताच तात्काळ उचित कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. यासाठी खालील अधिकाऱ्यांची नावे दिलेली आहेत. त्यांना सकाळी १० ते सांयकाळी ७ वाजेपर्यंत दिलेल्या संपर्क क्रमांकावर अथवा प्रत्यक्ष दिलेल्या पत्त्यावर अर्ज देऊन तक्रार नोंदवावी. संपर्क अधिकाऱ्यांची नावे, पत्ता व सपर्क क्रमांक जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड, के.एस. अंबुरे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जि.अ.कृ.अ. कार्यालय बीड मो.नं.९०७५८७१७२७ , पी.एस. सोनवणे कृषि साहयक जि.अ.कृ.अ. कार्यालय बीड. कृषि विकास अधिकारी, जि.प.बीड श्री.एस.डी.गरंडे कृषि विकास अधिकारी, जि.प.बीड मो.न. ९४२३६९०८६,४ श्री. भंडारी ए. बी कृषि विस्तार अधिकारी, जि.प.बीड. तालुका कृषि अधिकारी, बीड मो.नं. ९४२२७४४७४८, श्री.जी.एस. नागरगोजे कृषी अधिकारी, ताकृअ, बीड मो.न. ९४२३९८२३१९, तालुका शाखेचा कर्मचारी, पंचायत समिती, बीड श्री. अनिरुध्द सानप कृषि अधिकारी, पं.स.वीड मो.नं.९८५०७८९९१८, तालुका कृषि अधिकारी, पाटोदा, श्री.जी.यु. हिवराळे कृ.अ. ताकृअ.पाटोदा गो.नं.९४०४८५८८७२ तालुका शाखेचा कर्मचारी, पंचायत समिती, पंचायत पाटोदा. श्री. उदधव नेटके कृषि अधिकारी, पं.स.पाटोदा मो.नं.७५८८६३४८४५, तालुका कृषि अधिकारी, शिरुर कासार, श्री.एन.बी. गर्जे कृषी अधिकारी, ता.कृ.अ. शिरूर (का) मो.न ९४२२१६२८४० तालुका शाखेचा कर्मचारी, पंचायत समिती, शिरुर.कासार श्री.बी. के. खेडकर कृषि अधिकारी, शिरूर पं.स.बीड मो.न. ७५८८३४१५८३, तालुका कृषि अधिकारी, आष्टी, श्री.जी.यु. हिवराळे कृ.अ. ताकृअ. पाटोदा मो.नं.९४०४८५८८७२तालुका शाखेचा कर्मचारी, पंचायत समिती, आष्टी, श्री.एस.एन. राऊत कृषी अधिकारी, पं.स. आष्टी मो.न ९४२०४२२२३२, तालुका कृषि अधिकारी, माजलगाव, श्री.जे.एल. खेडकर कृषी अधिकारी, ता.कृ.अ. माजलगाव मो.न ९४२२३७४७९०, तालुका शाखेचा कर्मचारी, पंचायत समिती, माजलगाव, श्री.एस.जे.हजारे कृषि अधिकारी, पंचायत समिती माजलगाव मो.न. ७५८८६३४६९०, तालुका कृषि अधिकारी, गेवराई, श्री. रवि मुंडे कृषी अधिकारी, ता.कृ.अ. गेवराई मो.न ८६२३०५६२९८, तालुका शाखेचा कर्मचारी, पंचायत समिती, गेवराई, श्री.एस.यु.सुरडकर कृषि अधिकारी, पंचायत समिती गेवराई, मो.न. ९४२२७४३५८५, श्री. चेतन कांबळे, कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी धारूर, गो.न ९४०४७७६,८६७, पंचायत समिती, धारूर श्री. अमोल डाके, कृषि अधिकारी, पं.रा. धारूर गो.न. ९४२१८६५९५१, तालुका कृषि अधिकारी, वडवणी, श्री.एस.आर.बांगर कृषी अधिकारी, ता.कृ.अ. वडवणी मो.न ९४२२६१८२००, तालुका शाखेचा कर्मचारी, पंचायत समिती, वडवणी, श्री.एस.डी. घुगरे कृषि अधिकारी, पं.रा. वडवणी मो.न. ९९७०७६९५६३, तालुका कृषि अधिकारी, अंबाजोगाई, श्री. सुरेश ढाकणे कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी अंबाजोगाई मो.न ९४२३७७५२६३ तालुका शाखेचा कर्मचारी, पंचायत समिती, अंबाजोगाई श्री प्रविण मोरे, कृषि अधिकारी, पं.स. अंबाजोगाई मो.न. ९४२२०८७०८१, श्री. विकास अंभोरे तालुका कृषि अधिकारी, केज मो.न ७५६४३४२७१५ तालुका शाखेचा कर्मचारी श्री. राठोड. पंचायत समिती, केज, कृषि अधिकारी, पं.स. केज मो.न. ९४०४२०१५६७, , तालुका कृषी अधिकारी परळी कोमल मोरे कृषी अधिकारी मो.न ७९७२७२८०३७, तालुका कृषी अधिकारी, परळी, तालुका शाखेचा कर्मचारी, पंचायत समिती, परळी श्री साखरे कृषि अधिकारी, पं.स. परळी मो.न. ९४०४२०१५६७

---

## विधानपरिषदेच्या जागांवरून युती-आघाडीत रस्सीखेच सुरू

### राज्यपाल नियुक्त १२ जागांचाही निर्णय होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**लोकसभेची निवडणूक संपताच विधानपरिषदेच्या अनेक जागा रिक्त होत आहेत. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी आपला मोर्चा आता विधानपरिषदेच्या निवडणुकीकडे व( २०२४) ळवलेला पाहायला मिळतोय. त्याचसोबत दोन वर्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न झाल्यामुळे ९ जागा रिक्त आहेत. तर राज्यपाल नियुक्त १२ जागांचा तिढा अजूनही कायम आहे. त्यामुळे या सर्वच जागांसाठी सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केलेली पाहायला मिळतेय.**

यंदाच वर्ष खऱ्या अर्थाने निवडणुकांचं वर्ष मानलं जातंय. लोकसभा निवडणुकीची रणधूमाळी सुरु असताना आता विधानपरिषदेची तयारी राजकीय पक्षानी सुरु केली आहे. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या चार जागा रिक्त होत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ९ जागा आणि राज्यपाल नियुक्त १२ जागा रिक्त आहे. त्यामुळे एकुण ७८ जागांचं संख्याबळ ५१ वरती येणार आहे. त्यामुळे विधानपरिषदेतील अनेक गणितं बदलण्याची शक्यता आहे. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघातून ठाकरे गटाचे विलास पोतनीस, लोक भारतीचे कपिल पाटील, भाजपचे निरंजन डावखरे आणि अपक्ष किशोर दराडे हे निवृत्त होणार आहेत. जुलैमध्येही अनेक आमदार निवृत्त होणार आहेत. त्यामुळे सर्वच पक्षांमध्ये मोठी रस्सीखेच सुरू झाली आहे. या जागांच्या सोबतच राज्यपाल नियुक्त १२ जागांचा ही प्रश्न समोर आला आहे. महाविकास आघाडी सरकार असताना राज्यपालांनी महाविकास आघाडीच्या बारा नावांना मंजुरी दिलेले नव्हती. त्यामुळे अद्यापपर्यंत यावर निर्णय होऊ शकला नाही. न्यायालयातही हे प्रकरण आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपर्यंत यावर निर्णय अपेक्षित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मार्फत निवडून जाणाऱ्या ९ जागाही रिक्त आहेत. दोन वर्षांपासुन २९ महानगरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांची निवडणूक होऊ शकली नाही. त्यामुळे सर्व ठिकाणी प्रशासक पाहायला मिळत आहेत. विधानपरिषदेच्या नऊ जागाही रिक्त आहेत. ओबीसी आरक्षण प्रकरण न्यायालयात असल्यामुळे या निवडणुका होऊ शकत नसल्याचे पाहायला मिळतंय. त्यामुळे ९ विधानपरिषदेच्या आमदारांच्या जागा रिक्त आहेत. विधानपरिषदेच्या या जागा रिक्त असतानाच जुलैमध्ये आणखी काही आमदारांच्या जागा रिक्त होणार आहेत. त्यामुळे महाविकास आघाडी असेल किंवा महायुती प्रत्येकजण आपल्या पदरात जास्त जागा पाडून घेण्याचा प्रयत्न करत आहे. विरोधकांमध्ये शिवसेना ठाकरे गटाकडे विरोधी पक्षनेतेपद आहे. त्यामुळे आता जे काही आमदार निवडून येतील त्यावरती विरोधी पक्षनेता कोणाचा यावरती सुद्धा मोठी खडाजंगी होण्याची शक्यता आहे. तर शिवसेना शिंदे गटाकडे सभापतीपद आहे. त्यामुळे या निवडणुकांमध्ये ज्याची संख्या जास्त येईल त्या ठिकाणीही बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकसभेची रणधुमळी संपत असताना विधानसभेच्या तयारीला लागण्याच्या आधीच सर्वच राजकीय पक्ष विधानपरिषदेच्या तयारीला लागलेले आहेत. कारण विधानपरिषदेच्या आमदारांची संख्या मोठी आहे आणि त्यावरून परिषदेमध्ये संख्या बळावरुन विरोधी पक्षनेतेपद आणि सभापती पदाची सूत्रं ठरणार आहेत. त्यामुळे महायुतीसह महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांची रस्सीखेच सुरू आहे. मात्र राज्यपाल नियुक्त १२ आमदारांचा काय निर्णय होतो याकडेसुद्धा सगळ्यांच लक्ष लागलं आहे.

---

## लाभार्थींना डीबीटीद्वारे थेट खात्यावर मिळणार अनुदान

**वडवणी। प्रतिनिधी**

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन या योजनेचे अनुदान डीबीटी द्वारा कारण्य करता दि ७.२.२०२४ रोजी मां.सचीव व सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्हिडीओ कॉन्फ्रन्सद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.तसेच दि ९.२.२०२४ रोजी व दि २८.५.२०२४ रोजी सदर विषयी श्रावण बाळ व संजय गांधी योजनेचे अनुदान डी बी टी द्वारे करण्या करिता आवश्य कार्यवाही करण्या बाबत जिला स्थरावर बैठक घेण्यात आलेली आहे. सन २०२४ पासुन लाभार्थ्यांना अनुदान हे डी बी टी द्वारे वितरीत करण्या बाबत शासनाचे धोरण आहे.त्या अंनुषंगाने सर्व लाभार्थ्यांनी संबधीत तलाठी यांच्याकडे आधार कार्ड,बँक पासबुक,लाभार्थ्यांचा मोबाईल नं.योजनेचा प्रकार,जात प्रवर्ग,दिव्यंगाचा प्रकार व दिव्यांग टकेवारी, उत्पन्न प्रमाणपत्र,राशन कार्ड,लाभार्थ्यांच्या आधारला व बँकेस लिंक आसलेला मोबाइल नंबर या सर्व कागदपत्राची छायांकीत प्रत संबंधित गावचे तलाठी यांच्याकडे ३१.५.२०२४ पर्यन्त दाखल करावी जे लाभार्थी सदरील कागतपत्र सादर करनार नाहीत याची सर्वस्व जबाबदारी लाभार्थी यांची राहील याची सर्व लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी.करीता वडवणी तहसीलच्या वतीने तालुक्यातील लभार्थ्यांना कळवण्यात येत आहे.

---

## पान १वरून...

### सुप्रिया सुळे यांची शेतकरी आणि हिंजवडी

शेतकरी आर्थिकदृष्ट्या मोडून पडला आहे. त्यामुळे संपूर्ण कर्जमाफी देण्याची मागणी वारंवार संसदेसह विविध माध्यमातून केली. मात्र शेतकऱ्यांना दिलासा देण्यास सरकार तयार नाही. उलट त्यांचे अधिकाधिक शोषण कसे करता येईल अशी यंत्रणा प्राधाण्याने तयार करण्याचे काम सरकार करत असल्याचा आरोप सुळे यांनी केला आहे. यादरम्यान राज्यातील रोजगार देणारे उद्योग एकामागून एक बाहेर जात आहेत. मात्र राज्य सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याची टीका देखील सुळे यांनी केली आहे. तसेच सुळे म्हणाल्या, याआधी देखील राज्यातील महत्वाचे उद्योग बाहेर गेले. तरुणांच्या हक्काचा रोजगार गेला. मात्र सरकारचे यावर नियंत्रण नाही. लक्ष नाही. राज्यातील तरूणाई रोजगाराच्या शोधात असताना उद्योग बाहेर जात आहेत. याला सरकराचा निष्काळजीपणा कारणीभूत आहे असेही सुळे म्हणाल्या. गेल्या काही दिवसापासून राज्याच्या विविध भागात कडकडीत ऊन आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस होत आहे. यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. शेतीसह आर्थिक नुकसान झाल्याने हतबल झाला आहे. यावर मात्र राज्य सरकारने हात वर केले असून आचार संहिता असल्याने उपाय योजना करता येत नसल्याचे कारण पुढे केले आहे. यावरून राज्यातील शेतकरी नाराज झाला असून विरोधकांकडून राज्य सरकारवर टीका होत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून राजकारण तापले असतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आपल्या गावी सुट्टीवर गेले आहेत. यावरून देखील आता टीका सुरू झाली आहे.

-----------

### राहुल गांधींना पुणे सत्र न्यायालयात

नातू सात्यकी सावरकर यांनी पुणे सत्र न्यायालयात मानहानीची याचिका दाखल केली होती. त्यानंतर न्यायालयाने पुण्यातील विश्रामबाग पोलिसांना या प्रकरणाचा तपास करण्याचे आदेश दिले होते.

**राहुल गांधींच्या अडचणी वाढल्या**

पोलिसांनी अहवाल सादर केल्यानंतर न्यायालयाने राहुल गांधी यांना सीआरपीसी कलम २०४ अंतर्गत नोटीस बजावली होती. सात्यकी सावरकर यांनी भारतीय दंड संहिता कलम ४९९ आणि ५०० (मानहानी) अंतर्गत तक्रार दाखल करण्यासाठी गेल्या वर्षी एप्रिलमध्ये न्यायालयात धाव घेतली होती. विनायक दामोदर सावरकर यांचे नातू सात्यकी अशोक सावरकर यांनी राहुल गांधींविरोधात दाखल केलेल्या तक्रारीत प्रथमदर्शनी सत्य असल्याचे पुणे पोलिसांनी सांगितले.

**राहुल गांधींनी काय म्हटलं होतं ?**

न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत राहुल गांधींच्या वक्तव्याचा उल्लेख करण्यात आलाय. तक्रारीनुसार, राहुल गांधींनी भाषणात म्हटले की, सावरकरांनी एक पुस्तक लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी लिहिलं की, मी माझ्या ५-६ मित्रांसोबत जात एका मुस्लीम व्यक्तीला मारहाण केली होती. अशा केल्यानं मला आनंद झाला होता. दरम्यान, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधींच्या वक्तव्याचे खंडन केले होते. दरम्यान, राहुल गांधी आता पुणे सत्र न्यायालयात हजर होणार आहेत का? याकडे सर्वांचे लक्ष आहे.

-----------

### नवीन सरकार येईपर्यंत

शेवटच्या टप्प्यासाठी १ जून रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर ४ जून रोजी मतमोजणी होणार असून निकालानंतर आचारसंहिता हटवण्यात येईल अशी चर्चा होती. पण त्यावर आता निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिलं आहे. देशात नवीन सरकार स्थापन होईपर्यंत आचारसंहिता सुरूच राहणार असल्याचं आयोगाने सांगितलं आहे. तसेच या काळात राज्य सरकारला कोणतेही मोठे निर्णय घेता येणार नाहीत, जर काही अत्यावश्यक निर्णय घ्यायचा असेल तर त्यासाठी निवडणूक आयोगाची परवानगी घ्यावी लागेल असंही आयोगाने स्पष्ट केलं आहे.

**दुष्काळग्रस्त भागाला मदत जाहीर करण्यास अडचण**

देशात ४ जून रोजी निकाल लागल्यानंतर पुढील सरकार सत्तेत येण्यासाठी किमान १५ दिवस किंवा जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे. जून महिना त्यामध्ये पूर्ण जाऊ शकतो. एकीकडे राज्यात दुष्काळाची परिस्थिती आहे तर दुसरीकडे आचारसंहिता लागू असल्याने त्यावर कोणताही महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारला घेता येणार नाही. राज्य निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे दुष्काळग्रस्त नागरिकांना राज्य सरकार कशा पद्धतीने मदत करणार हे पाहावं लागेल.

**निवडणूक आचारसंहितेचा नियम काय सांगतो?**

देशात लोकसभा निवडणुका जाहीर होताच, निवडणूक आचारसंहिता लागू होते. तर, नव्या सरकारचा शपथविधी होईपर्यंत ती लागू राहते. या काळात विद्यमान सरकार कोणत्याही प्रकारची नवी घोषणा करू शकत नाही. लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जूनला लागणार आहे. निवडणूक निकालानंतर काही दिवसांनी नवीन सरकार सत्तेत येईल.

----------

### आशिष शेलार शिवतीर्थवर

जाहीर केली आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसनेही (अजित पवार) मुंबई शिक्षक मतदारसंघात शिवाजी नलावडे यांच्या नावाची घोषणा केली आहे. मनसेनं उमेदवाराची घोषणा केल्यानंतर, आता भाजप काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यावेळी, मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी मनसेला शुभेच्छा देत भाजप कोकण पदवीधरची निवडणूक लढवणार असल्याचे म्हटले होते. विशेष म्हणजे, ही जागा भाजप आमदाराची सिटींग जागा आहे, सध्या निरंजन डावखरे हे येथून आमदार आहेत, असे म्हणत शेलार यांनी निवडणूक लढणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतर, आता त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. आशिष शेलार यांनी आज राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ बंगल्यावर जाऊन त्यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही नेत्यांमध्ये कोकण आणि मुंबई पदवीधर मतदार संघातील निवडणुकीसंदर्भात झाली चर्चा झाल्याची माहिती आहे. त्यामुळे, कोकण पदवीधर मतदारसंघासाठी महायुतीचा उमेदवार नेमका कोणाचा असेल, याची चर्चा रंगली आहे. कारण, मनसेने कोकण पदवीधर मतदान संघासाठी अभिजीत पानसेंना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यातच, आता राज ठाकरे आणि आशिष शेलार यांची भेट झाल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

**मनसेला भाजपच्या पाठिंब्याची अपेक्षा**

दरम्यान, अभिजीत पानसे यांनी उमेदवारी जाहीर केल्याबद्दल राज ठाकरेंचे आभार मानले होते. तर, मनसेच्या अविनाश जाधव यांनी भाजपने मनसेलापाठिंबा द्यावा अशी इच्छा बोलून दाखवली होती. हिंदुत्त्वासाठी लोकसभा निवडणुकीत, विधानसभा निवडणुकीत, महापालिका निवडणुकीत बिनशर्त पाठिंबा द्यायचा, असा पक्ष चालत असतो का?, असा उपरोधात्मक टोलाही जाधव यांनी भाजपला दिला होता. त्यामुळे, कोकण पदवीधर मतदारसंघात भाजप महायुतीचा उमेदवार असणार की नाही, हे पुढील काही दिवसांतच स्पष्ट होईल.

----------

### धाकधुक वाढली: निकालासाठी

झाले असे नाही तर अगदी बीडच्या जिल्हाधिकारी तसेच पोलीस प्रशासन यांच्यावर सुद्धा उमेदवारांनी अनेक आरोप प्रत्यारोप केले आहेत. अगदी निवडणूक निर्णय अधिकारी सुद्धा बदलावी अशी मागणी बीडचे राष्ट्रवादीचे लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी केली होती. मोठ्या चूरशी च्या ठरलेल्या या लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणी यंत्रणेची सध्या युद्धपातळी वर तयारी सुरू आहे. बीड जिल्ह्यात एकूण सहा विधानसभा मतदारसंघ आहेत आणि या प्रत्येक विधानसभा निहाय ही मतमोजणी होणार आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणीचे १४ टेबल ठेवण्यात आलेले आहेत. या १४ टेबलवरती मतमोजणीची एक फेरी ही पंधरा मिनिटांमध्ये पूर्ण होणार आहे. प्रत्येक टेबलवर तीन कर्मचारी असणार आहेत.

-----------

### जितेंद्र आव्हाड यांच्या

गुन्हा दाखल झाला आहे. सोलापुरात देखील भाजप आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर जितेंद्र आव्हाड यांच्या पोस्टरला काळे फासले. तर मीरा भाईंदर येथे देखील भाजप कार्यकर्त्यांनी आंदोलन करत आव्हाड यांच्या फोटोला चपला मारत जोडे मारो आंदोलन केले आहे. धुळे येथेही जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. या ठिकाणी भाजप कार्यकर्त्यांनी आव्हाड यांचा फोटो कुत्र्याच्या गळ्यात अडकवून त्यांच्या विरोधात घोषणाबाजी केली.

------------

### बीड जिल्ह्याच्या तीव्र पाणी टंचाईवर आणि

टँकरला जी.पी.एस. प्रणाली बसवून घ्यावी. जनते बरोबरच ग्रामीण भागातील जनावरांनाही मोठ्या प्रमाणात पाणी लागते. त्यामुळे सध्याच्या तीव्र पाणी टंचाईवर जिल्हाधिकार्यांनी तातडीने उपाय योजना करणे गरजेचे आहे. पाणी टंचाईबरोबर सध्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील मोठ्या प्रमाणात उद्भवला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी तातडीने जनावरांच्या चाऱ्याची देखील व्यवस्था करावी असे नमूद केले आहे. जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांना निवेदन देण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक यांच्यासह श्यामभाऊ पडुळे उप सभापती बाजार समिती बीड, सुनील अनभुले बीड विधानसभा प्रमुख, सुनील सुरवसे जिल्हा संघटक, संतोष जाधव उप जिल्हप्रमुख बीड, दीपक काळे जिल्हा सह समन्वयक, सुदर्शन धांडे माजी शहरप्रमुख, हनुमंत पांडे उप शहर प्रमुख, किशोर जगताप माजी जिल्हा परिषद सदस्य, सुरेश तात्या शेटे, आकाश वडमारे मुकुंद भालेकर माजी नगरसेवक, सुनील गवते पाटील, गौरव वायभट, लखन घोलप, ओम राऊत याबरोबरच शिवसैनिक तथा इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------

# कृषी ड्रोन प्रशिक्षणासाठी तरुण शेतकऱ्यांचा पुढाकार स्तुत्य : आत्मा प्रकल्प संचालक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई येथे कृषी ड्रोन पायलट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा - आत्मा बीड प्रकल्प संचालक सुभाष साळवे होते. डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई येथील इनोव्हेशन इंक्युबेशन लिंकेज सेंटरचे संचालक डॉ. विशाल बाणेवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोणेरे येथील डॉ. ब्रिजेश अय्यर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील डॉ. कबीर खराडे, संभाजीनगर येथील श्रेयश महाविद्यालयचे डॉ. जयंत महाजन, एमआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयचे डॉ. संतोष कुलकर्णी, मांजरा कृषि विज्ञान केंद्राचे कृषी अभियंता डॉ. सचिन शिंदे व केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. वसंत देशमुख यांची मंचावर उपस्थिती होती.

कृषी ड्रोन पायलट विषयी एकदिवसीय कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना डॉ. देशमुख यांनी सांगितले की, शेतकऱ्यांपुढे मनुष्यबळाची समस्या आहे. शेतीच्या कामासाठी मजूर सहज उपलब्ध होत नाहीत.

# आई-वडिलांच्या कष्टाचे मोल लक्षात ठेवा भविष्यात यशाची शिखरे पादाक्रांत करा

## उच्च पदावर जा मी तुमचा सत्कार करायला जिथे असाल तिथे येईल - सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**



मोबाइलचे जसे चांगले फायदे आहेत, तसेच तोटे देखील आता समोर येऊ लागले आहेत. दीड-दोन वर्षाच्या चिमुकल्याच्या हाती देखील आता मोबाईल दिसू लागला आहे. घरातील कामे करीत असताना मुलगा चिडचिड करू नये म्हणून आईच त्याच्या हाती मोबाईल देऊ लागली.मोबाईलच्या अती वापरामुळे कुटुंबातील संवाद आता बंद झाल्याचे विदारक चित्र दिसत आहे.त्यामुळे पालकांनी आता सजगता दाखवणे गरजेचे आहे.कळत्या वयात विद्यार्थांनी देखील मोबाईलचा अती वापर टाळला पाहिजे आणि दहावी बारावी मध्ये जशी गुणांकन मिळवली त्यात सातत्य ठेऊन भविष्याची वाटचाल विद्यार्थांनी करावी तुम्ही कुठल्याही क्षेत्रात जा तिथे आपली गुणवत्ता सिद्ध करा उच्चपदस्थ झाल्यावर मी स्वतः तुमचा सत्कार करायला जिथे असाल तिथे येईल असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले.यावेळी व्यासपीठावर गटविस्तार अधिकारी मनोरंजन धस,विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे,सुरेश पवार, हिराशेठ बलदोटा उपस्थित होते.

आष्टी शहर तसेच परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना आ.धस म्हणाले की,आई वडील काबाडकष्ट करून मुलांच्या भविष्यासाठी हाडाची काड करत असतात.मुलांना जे पाहिजे ते तात्काळ उपलब्ध करून देतात मात्र त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवणाऱ्या वर्गाची संख्या आता दिवसेंदिवस कमी होत चालली असून.विद्यार्थी मोबाईलच्या अती वापरामुळे दिशाहीन होत असल्याचे विदारक चित्र समाजात दिसत आहे.फेसबुक, व्हॉट्सअँप, इंस्टाग्राम,स्नॅप यामुळे विद्यार्थी नको द्या दिशेला जात आहेत.आपण एक गोष्ट लक्षात घ्या जे आशियायी खेळाडू आहेत,ऑलिंपिक पदक विजेते आहेत,ज्यांना प्रामाणिकपणे काही तरी करण्याची इच्छा आहे असे विद्यार्थी मोबाईलचा वापर अगदी नगण्य करतात.त्यामुळे त्यांचे एकचित्त राहते आणि अभ्यासात सातत्य ठेवण्याचे काम त्यांच्याकडून होत असते.म्हणून पालकांनी देखील घरी गेल्यावर मुलांशी संवाद ठेवणे गरजेचे आहे.आणि मुलांनी देखील निवडक क्षेत्रात न जाता आपण जगाच्या पाठीवर अनेक शिक्षणाच्या माध्यमातून वेगवेगळे कोर्सेस आहेत त्यात प्रयत्न करा आणि आपले आपल्या गावाचे आणि देशाचे नाव रोशन करा.असेही शेवटी आ.धस म्हणाले.या कार्यक्रमात आष्टी शहरासह परिसरातील शंभरहून अधिक विद्यार्थी तसेच त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिराशेठ बलदोटा सूत्रसंचलन सतीश दळवी तर आभार सचिन रानडे यांनी मानले.

# मतमोजणी प्रक्रियेत सूक्ष्म निरीक्षकांची महत्त्वाची भूमिका: जिल्हा निवडणूक अधिकारी मुधोळ




**बीड । प्रतिनिधी**

मतमोजणी प्रक्रियेत सूक्ष्म निरीक्षकांची महत्त्वाची भूमिका असून सूक्ष्म मतमोजणी प्रक्रियेत सूक्ष्म निरीक्षकांची महत्त्वाची भूमिका असून हे निरीक्षक निवडणूक निरीक्षकांचे प्रतिनिधी म्हणून काम करतात त्यामुळे सूक्ष्म निरीक्षकांनी अधिक सजग राहून मतमोजणीच्या प्रक्रियेत सहभाग नोंदवण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी आज केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आज सूक्ष्म निरीक्षकांची मतमोजणीचे प्रशिक्षण घेण्यात आले त्यावेळी त्या बोलत होत्या. अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे हे यावेळी उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी अरविंद लाटकर यांनी सूक्ष्म निरीक्षकांचे प्रशिक्षण घेतले. सूक्ष्म निरीक्षक हे निवडणूक निरीक्षकांचे प्रतिनिधी म्हणून निवडणूक प्रक्रियेचा भाग असतात मतमोजणीच्या प्रक्रियेतही सूक्ष्म निरीक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. मतमोजणी कक्षात एक सुपरवायझर एक सहाय्यक आणि सूक्ष्म निरीक्षक असे तीन लोक असतात. मतमोजणीच्या वेळी प्रत्येक उमेदवाराला मिळालेले मत हे इंग्रजी भाषेत लिहायचे असून ते नीट लिहिले की नाही याची उलट तपासणी सूक्ष्म निरीक्षक हे करत असतात. सूक्ष्म निरीक्षक हे केंद्र शासनाच्या विविध विभागातले अधिकारी कर्मचारी आहेत. सूक्ष्म निधीक्षक हे थेट निवडणूक निरीक्षकांना रिपोर्टिंग करतील. प्रत्येक फेरीत १४ मतदान केंद्रांचे मतमोजणी केली जाणार असून कुठल्याही दोन मतदाना केंद्रांची सी यु हे सूक्ष्म निरीक्षकांच्या माध्यमातून निवडणूक निरीक्षक त्याची उलट तपासणी करतील. यासह एक फेरी संपल्यावर या फेरीतील कुठल्याही पाच मतदान केंद्रांच्या सीईयूंची पुन्हा तपासणी सूक्ष्म निरीक्षकांच्या माध्यमातून निवडणूक निरीक्षक करतील त्यामुळे सूक्ष्म निरीक्षकांचे काम अतिशय महत्त्वाचे असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी यावेळी सांगितले. भारतीय निवडणूक आयोगाच्या वेबसाईट सॉफ्टवेअर एन्कोर या सॉफ्टवेअर मध्ये अद्यावत करण्याचे कामही सूक्ष्मनिरीक्षकांचे असणार आहे हे अपडेशन झाल्यानंतर निवडणूक आयोग आकडेवारी घोषित करेल.मतमोजणी प्रक्रियेत पारदर्शकता असावी यासाठी भारत निवडणूक आयोगाने अजिमुल हक व बस्सवराज आर. सोमन्ना या सनदी सेवेतील दोन वरिष्ठ अधिकारी यांची मतमोजणी निरीक्षक म्हणून नियुक्ती केलेली आहे. या दोन्ही निवडणूक निरीक्षकांच्या आदेशांचे पालन सूक्ष्म निरीक्षक यांना करावे लागणार आहे.

# छत्रपती शंभूराजे जयंतीनिमित्त पुरस्कार सोहळा अन्नदान व साड्या वाटपाचा कार्यक्रम

## बुलंद छावा पुरस्काराने घोलप, सुरवसे, उगले होणार सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त शुक्रवार दि.३१मे रोजी जिव्हाळा बेघर केंद्र नवी भाजी मंडई बीड येथे अन्नदान व गरजू महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला असून प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बुलंद छावा समाजरत्न पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.





प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वर्ष ९ वे छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी नवी भाजी मंडई बीड येथील जिव्हाळा बेघर केंद्रामध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हा संघटक नितीन धांडे, मराठा क्रांती मोर्चा चे जिल्हा समन्वयक अॅड.मंगेश पोकळे, राष्ट्रीय छावाचे संस्थापक अध्यक्ष गंगाधर काळकुटे, स्वप्नील गलधर आदी उपस्थित राहणार आहेत.

छत्रपती शंभूराजे जयंतीनिमित्त यावर्षीचा बुलंद छावाचा पुरस्कार अॅड.संतोष घोलप, सामाजिक कार्यकर्ते अशोक सुरवसे, शिवव्याख्यानकार आर. आर. उगले यांना जाहीर झाला असून प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमात पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास शंभू प्रेमींनी उपस्थित राहावे असे आवाहन बुलंद छावाचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर, नारायण गवते, आजिनाथ आदमाने, जीवन धांडे, विजय पवार यांनी केले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी मंगल इंगोले

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष माननीय नामदार श्री सुनीलजी तटकरे साहेब बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी रोजगार व स्वयंरोजगार सेल चे जिल्हाध्यक्ष विजय दादा पोकळे महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अँड प्रज्ञा खोसरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी रोजगार व स्वयंरोजगार सेलच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी मंगलताई इंगोले यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री माननीय अजित दादा पवार प्रदेशाध्यक्ष माननीय सुनीलजी तटकरे साहेब यांच्या विचारानुसार रोजगार व स्वयंरोजगार सेलच्या माध्यमातून पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्य पर्यंत पोहोचण्यासाठी तसेच पक्ष संघटना बळकट करण्यासाठी आपले सहकार्य राहील असा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी रोजगार व रोजगार सेल महाराष्ट्र अध्यक्ष सौ मेघा हनुमंत पवार यांनी विश्वास टाकला आहे तसेच मंगलताई इंगोले यांची निवड झाल्याबद्दल रोजगार व स्वयंरोजगार सेल चे जिल्हाध्यक्ष विजय दादा पोकळे व राष्ट्रवादी ग्रंथालय विभागाचे बीड जिल्हा अध्यक्ष बालासाहेब फपाळ पाटील बीड तालुका अध्यक्ष अनिता आदापुरे महिला आघाडीच्या शहराध्यक्ष पूनम मॅडम गेवराई तालुका अध्यक्ष भीमराव जाधव बीड जिल्हा सल्लागार रूपाली गायकवाड सरचिटणीस बंडू घालमिले बीड तालुका अध्यक्ष रेखा खंडागळे छाया गायकवाड नीलम आहीवाडे गेवराई तालुका अध्यक्ष रोहिणी बाबर गेवराई तालुका उपाध्यक्ष कल्याणी खंडागळे श्री गणेश महाराज कोळेकर सारिका भांड शंकर बाबरसह अनेक पदाधिकारी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## पान ६ वरून...

पान ६ वरून...

### बीडला पुन्हा राष्ट्रीय

सरकारमध्ये ग्रामविकास मंत्री पदाची शपथ घेतली. मात्र अवघ्या आठच दिवसात रस्ता अपघातात त्यांचे निधन झाले आणि पुन्हा एकदा दिल्लीच्या राष्ट्रीय राजकारणात नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली. दहा वर्षापासून राष्ट्रीय राजकारणात मराठवाड्याचा दमदार नेता दिसत नाही. अशा परिस्थितीत दिवंगत मुंडे यांच्या राजकीय वारसा चालवणार्या पंकजा मुंडे यांना थेट केंद्रीय नेतृत्वाने यावेळी बीड लोकसभेच्या मैदानात उतरविले आहे. पंकजा यांनी पाच वर्षे महाराष्ट्रात आमदार आणि मंत्री म्हणून दमदार काम केले आहे. महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, राजस्थान, तेलंगणा, कर्नाटक अशा राज्यामध्ये मुंडेंना मानणार्या समाजामध्ये पंकजा मुंडे प्रचंड लोकप्रिय आहेत. पंकजा यांची नेतृत्व करण्याची क्षमता आणि जनसमर्थन लक्षात घेवूनच पक्षाने त्यांना दिल्लीच्या राजकारणात सक्रिय करण्याचा निर्णय घेतला. तीन वर्षापूर्वी राष्ट्रीय सचिव करून मध्यप्रदेशचे सहप्रभावी करण्यात आले होते. त्यामुळे लोकसभेच्या निवडणूकीनंतर पंकजा यांना केंद्रात मोठी जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. भारतीय जनता पार्टीत केंद्रीय स्तरावर दिवंगत अटल बिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांच्याबरोबरची एक पिढी आता वृध्दापकाळाकडे गेली आहे. सुषमा स्वराज यांच्यानंतर लोकसभेत सर्वसमावेशक महिला नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे पंकजा यांच्या माध्यमातून पक्षाला राष्ट्रीय स्तरावर महिला नेतृत्वाची पोकळी भरून काढण्याची संधी मिळणार असल्याने लोकसभेची निवडणूक राष्ट्रीय नेतृत्वाला जन्म देणारी ठरणार आहे. त्यामुळे बीड लोकसभेच्या निवडणूकीकडे राज्याचे नव्हे तर देशाच्या नेतृत्वाचे लक्ष लागले आहे.

### सप्तखंजरीवादक सत्यपाल


होत आहे की राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ वी जयंतीनिमित्त समाजप्रबोधनात्मक कार्यक्रम समाजसुधारक सप्तखंजीरीवादक सत्यपाल महाराज दिं ३१ मे २०२४ रोजी सांय.७:०० वाजता शिदोड. ता. जि.बीड येथे मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते प्रा . दत्ताभाई प्रभाळे, यांनी केले.

### पोलीस अधिकाऱ्याला लुटणाऱ्यांच्या

असतांना बामतीदार मार्फत माहिती मिळाली की, आरोपी नामे सुयोग प्रधान व त्याचेसोबत एक इसम हे अंबिका चौक परिसरात असल्याची खात्रीलायक बातमी मिळताच तात्काळ सदर परिसरात रवाना होवून शिताफिने आरोपी नामे १) सुयोग उर्फ छोटया मच्छिद्र प्रधान वय २६ वर्षे रा.पिंपगव्हाण रोड अंबिका चौक बीड, २) स्वप्निल उर्फ आदित्य उर्फ सोपान अशोक पाखरे वय २५ रा.भिंगार कॅम्प अहमदनगर यांना ताब्यात घेवुन गुन्हया अनुषंगाने विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कुबली दिली आहे. सदर दोन्ही आरोपी हे सराईत गुन्हे करण्याचे वृत्तीचे असुन त्यांचेवर यापुर्वी बीड व अहमदनगर जिल्यात अनेक गुन्हे आहेत. नमुद दोन्ही आरोपींना पो.स्टे.बीड शहर येथे पुढील कार्यवाहीसाठी जमा करण्यात आलेले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.स्टे.बीड शहर येथील सपोनि राठोड हे करीत आहेत. सदरची कामगिरी ही मा. नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.संतोष साबळे, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/मनोज वाघ, प्रसाद कदम, पोना/विकास वाघमारे, सोमनाथ गायकवाड, सचिन आंधळे, अश्विनकुमार सुरवसे, सुनिल राठोड, संजय जायभाये नेम. स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

# मोफत त्वचारोग तपासणी शिबिर आणि ५०% सूटचा लाभ घ्यावा - डॉ. पूनम भालेराव

**बीड । प्रतिनिधी**



शहरातील स्किनोवेशन क्लिनिक, स्किन, हेअर अँड लेसर सेंटर, बी.एच.एम.एस. कॉलेजच्या बाजूस, सिद्धी फोटो स्टुडिओ शेजारी, माने कॉम्प्लेक्स रोड, बीड येथे येत्या शनिवार रोजी दिनांक १ जून २०२४ रोजी सकाळी १०:०० ते संध्याकाळी ०५:०० पर्यंत मोफत त्वचारोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दिनांक २० जून २०२४ पर्यंत विविध सुविधांवर ५०% सूट ही देण्यात येणार आहे. या शिबिराचा व सूटचा गरजवंत रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. पूनम भालेराव यांनी केले आहे.

या शिबिरामध्ये पिंपल्स (मरूम), वांग, चेहऱ्यावरील सुरकुत्या, डोळ्याखालील काळे डाग, कोरडी त्वचा, नखांचे आजार, गजकर्ण, पांढरे डाग (कोड), सोरियासिस, स्ट्रेच मार्क (व्रण), त्वचेचे सर्व आजार, सनटेन ट्रीटमेंट, स्कीन टायटनिंग, केस गळती, केसातील कोंडा, केसांची वाढ खुंटणे, हायड्रोफेशियल (अॅडव्हान्स मशीनद्वारे), मायक्रो नीडलिंग, पी.आर.पी. (केसांसाठी व त्वचेसाठी), लेझर मशीनद्वारे शरीरावरील अनावश्यक केसांसाठी उपचार, टॅटू-गोंदण काढणे, केमिकल पिलिंग, मस-चामखीळ काढणे, इत्यादींची तपासणी शिबिरात मोफत केली जाणार आहे. याकरिता शिबिरात तपासणी करायची असल्यास रुग्णांनी ८०८०९७३५९८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून नाव नोंदणी करावी किंवा शिबिरापूर्वी स्किनोवेशन क्लिनिक, स्किन, हेअर अँड लेसर सेंटर, बी.एच.एम.एस. कॉलेजच्या बाजूस, सिद्धी फोटो स्टुडिओ शेजारी, माने कॉम्प्लेक्स रोड, बीड येथे प्रत्यक्ष संपर्क साधून १ जून रोजी मोफत तपासणी आणि २० जून पर्यंत विविध सुविधांवर ५०% सूट चा लाभ घ्यावा. असे आवाहन डॉ. पूनम भालेराव यांनी केले आहे.

# जय जवान माध्यमिक विद्यालय कवडगाव (बु.) विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

**वडवणी । प्रतिनिधी**







नुकत्याच झालेल्या इयत्ता दहावी वर्गाचा निकाल २७ मे २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला असून या मध्ये अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित, जय जवान माध्यमिक विद्यालय कवडगाव(बू ) ता.वडवणी जि.बीड विद्यालयाचा इ.१० वी मध्ये घवघवीत यश संपादन करणारे विद्यार्थी १) डोंबाळे अमृता दिनकर (प्रथम) -८८.८०% २) सोनवणे आम्रपाली राहूल(द्वितीय) - ८२.००%. ३) शेख आनम फातेमा सादेक(तृतीय) -७९.८०% ४) कुरेशी नाजिया नौशाद - ७९.००% ५) सय्यद अमन अबरार-७७.६०% गुणानुक्रमे उत्तीर्ण झाले असून १७ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झालेले आहेत. व सर्व उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन

संस्थेच्या संस्थापिका आदरणीय सुशीलाताई मोराळे मॅडम, संस्थेचे सचिव आदरणीय डॉ. अजीतजी पाखरे साहेब, आदरणीय शिवराजदादा पाखरे साहेब ,संस्थेचे सर्व पदाधिकारी, तसेच गावातील सरपंच,उपसरपंच शिक्षणप्रेमी व मान्यवर, माजी विद्यार्थी,पालक वर्ग तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक. श्री. सारोक्ते डि.जी सर तसेच सर्व कर्मचारी घाडगे एस.डी, टाले एच.पी, हंगे एस.एस, यादव एस.एन, मुंडे एस.एच,येवले बी.बी, चोपडे एस.के, श्रीमती.तौर एस.बी, गोंदरे जी.एम आदी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी इ.१० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. व पुढिल वाटचालीस शुभेच्छा दिल्या.सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्यावतीने मन:पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा!.

# उत्कृष्ट दर्जाचे खते- बियाणे शेतकऱ्यांना मिळण्यासाठी उपयोजना करावी -सरपते

**बीड । प्रतिनिधी**

या वर्षी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामात उत्कृष्ठ दर्जाचे खते-बियाणे मिळावे या करिता उपयोजना करावे. वंचीतचे मिलींद सरपते यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

कारण वर्ष २०२० साली मराठवाड्यात बोगस बियाणामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले होते. विशेषतः बीड जिल्हातील शेतकरी दुबार पेरणीमुळे प्रचंड संकटात सापडला होता. विशेषतः शेतकऱ्यांना सोयाबीनचे बियाणे उत्कृठ दर्जाचे मिळणे गरजेचे आहे व खते-बियाणे उपलब्ध असताना सुद्धा ती शेतकऱ्यांना मिळत नाहीत. काही व्यापारी खते व बियाणे एकाच वेळेस घेणे अनिवार्य करत असतात. नाही तर युरिया सारखे खते उपलब्ध असून सुद्धा शेतकऱ्यांना देत नाहीत. याची पुढील काळात प्रशासनाने गंभीर दखल घेतली पाहिजे व बोगस खते-बियाणे विक्रीविरोधात तालुकानिहाय भरारी पथकांची पथकामार्फत दोषी विरोधात कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे सामाजिक तथा वंचीतचे मिलींद सरपते यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



# कांदा निर्यातबंदीचा मोठा फटका, परकीय चलनात ६४९ कोटींची तूट

तर ८ लाख मेट्रीक टन कांद्याची निर्यात कमी

सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत आहे. कारण कांद्यावरील निर्यातबंदी हटवून देखील कांद्याचे दर वाढत नाहीत. याचा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना () बसत आहे. दरम्यान, केंद्र सरकारनं केलेल्या कांदा निर्यातबंदीचा मोठा फटका बसला आहे. कांदा निर्यात बंदीमुळं परकीय चलनात ६४९ कोटी रुपयांची तूट आली आहे. तर ८ लाख १७ हजार ५३० मेट्रिक टन कांद्याची निर्यात कमी झाली आहे.

कांदा निर्यातीबाबत केंद्र सरकारकडून नेहमीच धरसोडीचे धोरण अवलंबले जात आहे. याचा परिणाम देशाच्या परकीय चलणावर होत आहे. गेल्या आर्थिक वर्षात परकीय चलनात ६४९ कोटी रुपयांची तूट तर ८ लाख १७ हजार ५३० मेट्रिक टन कांद्याची निर्यात कमी झाल्याची बाब अपेडाच्या आकडेवारीतून समोर आली आहे. सन २०२३ ते २४ या आर्थिक वर्षामध्ये १७ लाख ७ हजार ९९८ मेट्रिक टन कांदा निर्यात झाला आहे. यातून ३ हजार ८७४ कोटी रुपयांचे चलन मिळाले आहे. तर सन २०२२ ते २३ या आर्थिक वर्षामध्ये २५ लाख २५ हजार २५८ मेट्रिक टन कांदा निर्यात झाला आहे. यातून ४ हजार ५२२ कोटी रुपयांचे चलन मिळाले आहे.




केंद्र सरकारनं अटी शर्ती न लावता संपूर्ण कांदा निर्यातबंदी उठवावी. दरम्यान, यावर्षी कांद्यावर निर्यातबंदी लावल्यामुळं कांद्याची निर्यात ही कमी झाली आहे. यामुळं शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. त्यामुळं केंद्र सरकारनं तातडीने अटी शर्ती न लावता संपूर्ण कांदा निर्यात बंदी उठवण्याची मागणी या क्षेत्रातील तज्ञ व मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर यांनी केली आहे.

८ डिसेंबर २०२३ रोजी सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर घातली होती बंदी. दरवर्षी कांद्याच्या मुद्यावरुन देशातील राज्यातील वातावरण चांगलेच गरम होत असते. कारण सरकारच्या धोरणाचा नेहमीच कांदा उत्पादकांना फटका बसतो. यावेळी देखील सरकारच्या धोरणाचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसला. सरकारनं ८ डिसेंबर २०२३ रोजी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. ही बंदी घालताना सरकारनं ३१ मार्चपर्यंत बंदी उटवणार असल्याचे सांगितले होते. मात्र, सरकारनं ३१ मार्चला बंदी उठवली नाही. जोपर्यंत पुढील आदेश येत नाही तोपर्यंत कांद्याची निर्यात बंदच राहणार असल्याचे सरकारच्या वतीनं सांगण्यात आलं. याचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला होता.

निर्यातबंदीचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका : निर्यातबंदीच्या आधी कांद्याचे दर हे ४००० ते ५००० रुपये प्रतिक्किंटलपर्यंत गेले होते. याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होत होता. मात्र, अचानक सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. ४००० ते ५००० रुपये प्रतिक्किंटलपर्यंत गेलेला कांदा १००० ते १५०० रुपये प्रतिक्किंटलपर्यंत खाली आला. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. वेळोवेळी मागणी करुन देखील सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठवली नाही. परिणाम शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागला.

## मुंबई, ठाणेसह कोकणात पावसाची शक्यता



मुंबई : राज्यात ऊन-पावसाचा खेळ पाहायला मिळत आहे. कुठे पावसाची हजेरी दिसत आहे, तर कुठे उन्हाचे चटके बसत आहे. पुढील चार दिवस राज्यातील अनेक भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर कुठे उष्णतेच्या लाटेचा अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई, ठाणेसह, पालघरमध्ये आज पावसाची शक्यता आहे. याशिवाय, पालघर, रायगड आणि रत्नागिरीमध्येही पावसाची रिमझिम पाहायला मिळेल. या भागात आजसह पुढील चार दिवस पावसाची शक्यता कायम आहे.

या भागात पावसाची शक्यता

आज राज्यात विविध भागात पावसाची शक्यता आहे. आजपासून पुढील चार दिवस महाराष्ट्रात विविध भागात पावसाची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजनुसार, २९ मेपासून ते १ जूनपर्यंत राज्याच्या विविध भागात पावसाची शक्यता आहे. पुढील चार दिवस कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आयएमडीच्या ताज्या अंदाजानुसार, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या भागात पावसाची शक्यत आहे. तसेच, कोल्हापूर, सातारा, नांदेड, लातूर, उस्मानाबाद या जिल्ह्यातह पावसाची शक्यता आहे.

या भागात उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज आणि यलो अलर्ट : याशिवाय, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक याभागात कोरडं वातावरण राहण्याची शक्यता आहे. तसेच, अहमदनगर, पुणे याभागात कोरडं वातावरण असेल. दरम्यान, अकोला जिल्ह्यात मात्र तापमानाचा पारा वाढण्याचा अंदाज आहे. आयएमडीने २९ मे रोजी अकोला जिल्ह्याला उष्णतेच्या लाटेच्या यलो अलर्ट दिला आहे. याशिवाय, चंद्रपूर जिल्ह्यालाही २९ आणि ३० मे साठी उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. नागपूर, वर्धा या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

## कृषी विभागाचा कृषी केंद्रांना दम; खतं अन्? बियाणे महाग विकाल तर बघाच

नाशिक : खरीप हंगाम २०२४ ( २०२४) करिता जिल्ह्यात खते व बियाणे यांची पुरेशा प्रमाणात उपलब्धता असून, शासनाकडून खतांचे एकूण २.२१ लाख मे. टन आवंटन जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आले आहे. तसेच कृषी निविष्ठाच्या विक्रीसंदर्भात नियंत्रण ठेवण्याकरिता १७ भरारी पथकांची नियुक्ती केल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या कृषी विकास अधिकारी माधुरी गायकवाड यांनी दिली आहे.



जिल्ह्याकरिता कापूस, भात, बाजरी, ज्वारी, मका, सोयाबीन, भुईमुग, तुर, मुग व उडीद, इ. पिकांच्या मागणीनुसार बियाणे पुरवठा सुरु झाला आहे. जिल्ह्यात खते व बियाणे यांची पुरेशा प्रमाणात उपलब्धता होत आहे. खरीप हंगाम २०२४ करिता शासनाकडून युरिया, डीएपी, एमओपी, एसएसपी व संयुक्त खतांचे एकूण २.२१ लाख मे.टन आवंटन नाशिक जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आले आहे. दि. २७ मे २०२४ अखेर जिल्ह्यात युरिया खत ५५ हजार ३७२ मे.टन, डीएपी ११ हजार ९५१ मे.टन, एमओपी २ हजार ३६१, एसएसपी १३ हजार ९५८ मे.टन व संयुक्त खते ८३ हजार ३८६ मे. टन असे एकूण १६७०२८ मे.टन खत उपलब्ध आहे. जिल्ह्यातील किरकोळ खत विक्रेत्यांकडे दैनंदिन उपलब्ध असलेल्या रासायनिक खतांची माहिती कृषिक या मोबाईल ॲपवर चावडी या सदराखाली उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, अशी माहिती गायकवाड यांनी दिली आहे.

कृषी विभाग किंवा वजन मापे निरीक्षकांकडे तक्रार करण्याचे आवाहन

कृषी निविष्ठा गुणवत्ता व दर्जाची हमी देणाऱ्या अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी कराव्यात. निविष्ठा खरेदी करताना सील अथवा मोहोरबंद पाकिटे / पिशव्या / बाटल्या असल्याची खात्री करावी. बियाणे उगवणीच्या खात्रीसाठी पाकिटावरील अंतिम मुदत पाहून घ्यावी. शेतकरी () बांधवांनी परवानाधारक कृषी निविष्ठा केंद्रातूनच व पक्क्या पावतीवरच कृषी निविष्ठा खरेदी कराव्यात. तसेच अनुदानित रासायनिक खताची खरेदी ही - मशिनद्वारेच करावी. कमी वजनाच्या निविष्ठा व पाकिटावरच्या छापील किंमतीपेक्षा जास्त किंमतीने विक्री करणे तसेच मागणी व्यतिरीक्त इतर निविष्ठांची शेतकऱ्यांना सक्ती करणे हे बेकायदेशीर असून याबाबत कृषि विभागाकडे तसेच वजनेमापे निरीक्षकांकडे तक्रार नोंदवावी.


१७ भरारी पथकांची नियुक्ती

विभाग व जिल्हास्तरावर प्रत्येकी १ आणि तालुकास्तरावर प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण १७ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा व तालुकास्तरावर तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांनी कृषि निविष्ठाबाबत काही तक्रार असल्यास ७८२१०३२४०८ या भ्रमणध्वनी क्रमांक तसेच जवळच्या कृषि विभागाच्या कार्यालयात तक्रार नोंदवावी, असे आवाहनही कृषि विभागामार्फत करण्यात आले आहे.

## जनावरांचं टॅगींग पूर्ण करा, अन्यथा खरेदी विक्रीस मनाई, अहमदनगरमध्ये १८ लाख टॅगींग पूर्ण

राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने जनावरांना कानातील टॅग लावणे बंधनकारक केले आहे. १ जूनपासून असे टॅगिंग नसल्यास पशुपालकांना जनावरांची खरेदी-विक्रीसह वाहतूकही करता येणार नाही असा निर्णय घेतला आहे. अहमदनगर जिल्ह्यात गाय आणि म्हैसवर्गीय १८ लाख ८७६ जनावरांचे टॅगिंग पूर्ण झाले असल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाच्या वतीनं देण्यात आली आहे.

आपत्ती काळात जनावर दगवल्यास अनुदान मिळवण्यासाठी हा टॅग आवश्यक : केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय डिजिटल पशुधन अभियानाचा भाग म्हणून भारतीय पशुधन प्रणाली लागू केली आहे. ही प्रणाली पशुधनासाठी सर्व प्रकारचे कान टॅगिंग रेकॉर्ड करते. त्यामुळं जनावरांची जन्म आणि मृत्यू नोंदणी, प्रतिबंधात्मक औषध, लसीकरण, वंध्यत्व उपचार, मालकी हक्क आणि जनावरांच्या खरेदी-विक्रीचे तपशील यासारखी माहिती यातून उपलब्ध होणार आहे. शिवाय आपत्ती काळात जनावर दगवल्यास अनुदान मिळवण्यासाठी हा टॅग आवश्यक असणार आहे. जनावरांचे टॅगिंग नसल्यास शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही. त्यामुळं पशुपालकांना आपल्या जनावरांचे इअर टॅगिंग करुन घेणं आवश्यक आहे. त्यासाठी पशुपालकांनी आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे.



इअर टॅगिंग केल्यानंतर सर्व नोंदी ऑनलाईन करुन घेण्यास मदत

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत -नॅशनल डिजीटल लाईव्हस्टॉक मिशन अंतर्गत भारत पशुधन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीमध्ये पशुपालकांकडील सर्व पशुधनास इअर टॅगिंग (कानातील पिवळा बिल्ला) केल्यानंतर सर्व नोंदी ऑनलाईन करुन घेण्यास मदत होणार आहे. त्यामळं लवकरता लवकर पुशपालकांनी आपल्या जनावरांचे टॅगींग पूर्ण करुन घ्यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

पशुसंवर्धन विभागानं केलं आवाहन

जनावरांचे एअर टॅगींग केल्यामुळं सर्व पशुधनाची प्रजनन आरोग्य, मालकी हक्क, जन्म मृत्यु इ. सर्व माहिती उपलब्ध होणार आहे. त्याकरिता सर्व पशुधनास कानात टॅग लावुन त्याची भारत पशुधन प्रणलीमध्ये नोंदणी आवश्यक असल्याची माहिती पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली आहे. पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे कानात बिल्ले मारुन घेण्यासाठी त्वरित आपल्या नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा असे आवाहन देखील राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे. त्यामुळं आता पशुसंवर्धन विभागाच्या आवाहनानंतर किती पशुपालक आपल्या जनावरांच्या कानाला टॅगींग करुन घेतात हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१२२३ : कालका नदीची लढाई : चंगीझ खान व पूर्व स्लाव्हिक सैन्यांमध्ये चकमक. मोंगोल सैन्याचा विजय.
१७२७ : फ्रान्स, ब्रिटन आणि नेदरलँड्स या देशांनी पॅरिस करारावर स्वाक्षरी केल्या.
१७५९ : अमेरिकेच्या पेनसिल्व्हेनिया प्रांतात नाटकांवर बंदी.
१७७४ : ब्रिटीश कालीन भारतात पहिल्या पोस्ट सेवा कार्यलयाची स्थापना करण्यात आली.
१७९० : अमेरिकेत १७९०चा कॉपीराईट कायदा लागू.
१८६७ : मुंबई इथे प्रार्थना समाजाची स्थापना करण्यात आली.
१९१० : दक्षिण आफ्रिकेला स्वातंत्र्य.
१९१३ : अमेरिकेच्या संविधानातील १३वा बदल संमत.
१९२१ : अमेरिकेतील तल्सा शहरात वांशिक दंगे. ३९हून अधिक ठार.
१९२१ : आधुनिक गुजराथीतील प्रसिद्ध कवी सुरेश हरिप्रसाद जोशी यांचा जन्म.
१९२४ : सोवियेत संघाने बाह्य मोंगोलियावरील चीनचे आधिपत्य मान्य केले.
१९२७ : फोर्ड मोटर कंपनीची मॉडेल टी प्रकारची शेवटची कार तयार झाली. या प्रकारच्या एकूण १,५०,०७,००३ कार तयार केल्या गेल्या.
१९३५ : पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील क्वेट्टा येथे झालेल्या ७.७ रिच्टर तीव्रतेच्या भूकंपात ५६,००० लोक ठार झाले.
१९४२ : दुसरे महायुद्ध : जपानच्या पाणबुड्यांनी सिडनीवर हल्ला केला.
१९४२ : दुसरे महायुद्ध : लुफ्तवाफेने इंग्लंडमधील कोव्हेन्ट्री गावावर बॉम्बफेक केली.
१९५२ : जनरल ड्वाइट डी. आयझेनहॉवर अमेरिकन सैन्यातून निवृत्त.
१९५२ : संगीत नाटक अकादमी ची स्थापना.
१९६१ : दक्षिण आफ्रिका प्रजासत्ताक झाले.
१९६२ : वेस्ट ईंडीझ संघाचे विघटन.
१९७० : पेरू मध्ये भूकंप. डोंगर कोसळून युंगे गाव नष्ट. ४७,००० ठार.
१९७४ : यॉम किप्पुर युद्ध इस्रायेल व सिरीयामध्ये तह.
१९९० : नेल्सन मंडेला यांना लेनिन आंतरराष्ट्रीय शांतता पुरस्कार जाहीर.
१९९२ : प्रख्यात गुजराती कवी हरिंद्र दवे यांना १९९१ चा कबीर सन्मान मध्य प्रदेश सरकारकडून जाहीर.
२००५ : वॉटरगेट कुभांड : डब्ल्यु. मार्क फेल्टने आपणच डीप थ्रोट नावाने ओळखला जाणारा गुप्त बातमीदार असल्याचे कबूल केले.
२०१० : भारतात मान्यता मिळालेल्या प्रत्येक खासगी शाळेत गरीब मुलांसाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्याचा कायदा करण्यात आला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४६९ : मनुएल पहिला, पोर्तुगालचा राजा.
१५५७ : फियोदोर पहिला, रशियाचा झार.
१५७७ : मुघल शासक बादशाहा जहांगीर यांच्या पत्नी नूरजहाँ यांचा जन्मदिन.
१६४० : मिकाल विस्नियोवीकी, पोलंडचा राजा.
१६८३ : सेल्सियस थर्मामीटरचे शोध लावणारे जीन पियरे क्रिस्टिन यांचे जन्म. (मृत्यू: १९ जानेवारी १७५५)
१७२५ : महाराणी अहिल्याबाई होळकर यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १७९५)
१८४३ : भारतातील प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी नाटककार बळवंत पांडुरंग किर्लोस्कर उर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्मदिन.
१८५२ : फ्रान्सिस्को मोरेनो, आर्जेन्टिनाचा शोधक.
१९१० : बालसाहित्यकार, विज्ञानकथाकार भास्कर रामचंद्र तथा भा. रा. भागवत यांचा जन्म. (मृत्यू: २७ ऑक्टोबर २००१)
१९२३ : रैनिये तिसरा, मोनॅकोचा राजा.
१९२८ : पंकज रॉय, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९३० : क्लिंट ईस्टवूड, अमेरिकन अभिनेता, चित्रपट निर्माता, दिग्दर्शक.
१९३१ : जॉन रॉबर्ट श्रीफर, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
१९३५ : जिम बॉल्जर, न्यू झीलँडचा पंतप्रधान.
१९३८ : जॉन प्रेस्कॉट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१९४३ : ज्यो नेमथ, अमेरिकन 'फूटबॉल'पटू.
१९६६ : रोशन महानामा, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४०८ : आशिकागा योशिमित्सु, जपानी शोगन.
१४१० : मार्टिन पहिला, अरागॉनचा राजा.
१७४० : फ्रीडरीक पहिला, प्रशियाचा राजा.
१७९९ : पिएर लेमॉनिये, फ्रेंच अंतरिक्षशास्त्रज्ञ.
१८७४ : प्राच्यविद्या पंडित, पुरातत्त्वज्ञ रामकृष्ण विठ्ठल तथा भाऊ दाजी लाड यांचे निधन. (जन्म: ७ सप्टेंबर १८२२ मांजरे, पेडणे, गोवा)
१९८८ : प्रसिद्ध भारतीय समाजसुधारक व हिंदी भाषिक लेखक संतराम बी. ए. यांचे निधन.
१९८८ : भारतीय राष्ट्रीय पक्षाचे राजकारणी व मध्यप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री व लेखक पं. द्वारका प्रसाद मिश्रा यांचे निधन.
१९१० : वैद्यकशास्त्रातील पहिली महिला पदवीधर डॉ. एलिझाबेथ ब्लॅकवेल यांचे निधन. (जन्म: ३ फेब्रुवारी १८२१)
१९६२ : एडॉल्फ आइकमन, नाझी अधिकारी.
१९७३ : कथालेखक दिवाकर कृष्ण केळकर तथा दिवाकर कृष्ण यांचे निधन. (जन्म: १९ ऑक्टोबर १९०२ गुंटकल, अनंतपूर, आंध्र प्रदेश)
१९९४ : बनारस घराण्याचे नामवंत तबलावादक पंडित सामताप्रसाद यांचे निधन. (जन्म: २० जुलै १९२१ वाराणसी)
२००२ : सुभाष गुप्ते, भारतीय क्रिकेट खेळाडू, लेग स्पिनर गोलंदाज, त्रिनिदाद येथे.
२००३ : प्रतिभासंपन्न संगीतकार अनिल बिस्वास यांचे निधन. (जन्म: ७ जुलै १९१४)
२००९ : केरळ साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय इंग्रजी भाषिक कवी तसचं, भारतातील केरळ राज्यातील मल्याळम भाषिक लेखिका कमला दास यांचे निधन.

## थोडक्यात



### सावरकर जयंती दिनी सामुहिक वंदे मातरम गायन

अंबाजोगाई: येथील ब्राम्हण ऐक्य परिषद व पेशवा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या जयंती निमित्ताने सामुहिक वंदे मातरम गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी सामाजिक कार्यकर्ते, नंदकिशोर मुंददा, राजकिशोर मोदी, डॉ.अतुल देशपांडे, शैलेष गोस्वामी, अविनाश मुडेगांवकर, अक्षय मोहरीर, पद्मनाथ कुंबेफळकर, अवधुत देशपांडे, सुमित केजकर, राहूल देशपांडे, सागर दिक्षित, राघवेंद्र देशपांडे, अमोल कुलकर्णी, गिरीष देशपांडे, मनोज जोशी, डॉ.प्रज्वल देशपांडे, उमेश माके, योगेश कुलकर्णी, अजय पांडे, अक्षय खडके, संतोष देशपांडे, मुकूंद घाटे, कल्पना गोस्वामी, जया मुडेगांवकर, प्रज्ञा रामदासी, कल्याणी विर्धे,प्रतिक्षा बर्दापुरकर, उमा जोशी, गिताजंली कुलकर्णी, माधुरी कराडे,आदींसह इतर महिला, युवक उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी सावरकरांनी देशाला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी प्राण पणाला लावले त्यांचे हे अत्युच्च देशप्रेम आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी आहे असे मत उपस्थित पाहुण्यांनी व्यक्त केले.

### अहिल्यादेवी होळकर पुतळा परिसरातील दुरुस्तीच्या कामाला सुरुवात

बीड: बीड शहरातील अहिल्या देवी होळकर यांचा पुतळा परिसरात स्वच्छतेचे तसेच फरशांच्या दुरुस्तीचे काम तसेच सुशोभीकरण बाणाई महिला सेवाभावी संस्थेच्या वतीने मिनाक्षी देवकते डोमाळे यांनी नगर परिषद मुख्याधिकारी यांच्याशी वेळोवेळी लेखी पत्र व्यवहार तसेच पाठपुरावा करुन उद्या होणार्या अहिल्यादेवी होळकर जयंतीसाठी सुशोभीकरण करुन घेतले आहे. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अहिल्यादेवी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी बाणाई सेवाभावी संस्था व अहिल्या महिला आघाडीच्या वतीने अहिल्यादेवी होळकर जयंतीची तयारी बाणाई महिला सेवाभावी संस्थेच्या वतीने करण्यात आली असल्याचे संस्थेच्या मिनाक्षी देवकते डोमाळे यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे. तसेच दि.३१ मे २०२४ रोजी होणारे रक्तदान शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ.उषा दराडे, सुशिला मोराळे यांची उपस्थिती राहणार असून जयंतीनिमित्त लोकोपयोगी कार्यक्रम घेणार असल्याचे पत्रकाद्वारे सांगितले आहे. कार्यक्रमाच्या वेळी समाजातील सर्व घटकांना आमंत्रित केले असून तृतीयपंथी असणार्या बीड येथील सपना बाळू धुताडमल यांचा सत्कार देखील यावेळी होणार आहे तसेच जयंतीनिमित्त महिलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मिनाक्षी देवकते डोमाळे, शेख राणीताई,पुनम कांबळे, अरुणा आठवले, अलका डोंगरे, रेहाना पठाण, यांनी केले आहे.

### जय जवान विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा

वडवणी : नुकत्याच झालेल्या इयत्ता दहावी वर्गाचा निकाल २७ मे २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला असून या मध्ये अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित, जय जवान माध्यमिक विद्यालय कवडगाव(बू ) ता.वडवणी जि.बीड विद्यालयाचा इ.१० वी मध्ये घवघवीत यश संपादन करणारे विद्यार्थी डोंबाळे अमृता दिनकर (प्रथम) -८८.८०%, सोनवणे आम्रपाली राहूल(द्वितीय) -८२.००%, शेख आनम फातेमा सादेक(तृतीय) -७९.८०%, कुरेशी नाजिया नौशाद -७९.००%, सय्यद अमन अबरार- ७७.६०% गुणानुक्रमे उत्तीर्ण झाले असून १७ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झालेले आहेत. व सर्व उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन संस्थेच्या संस्थापिका आदरणीय सुशीलाताई मोराळे मॅडम, संस्थेचे सचिव डॉ. अजीत पाखरे, आदरणीय शिवराज पाखरे ,संस्थेचे सर्व पदाधिकारी, तसेच गावातील सरपंच,उपसरपंच शिक्षणप्रेमी व मान्यवर, माजी विद्यार्थी,पालक वर्ग तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक. सारोक्ते डि.जी सर तसेच सर्व कर्मचारी घाडगे एस.डी, टाले एच.पी, हंगे एस.एस, यादव एस.एन, मुंडे एस.एच,येवले बी.बी, चोपडे एस.के, तौर एस.बी, गोंदरे जी.एम आदी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी इ.१० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. व पुढिल वाटचालीस शुभेच्छा दिल्या

### संगीत साधना मंचची मासिक संगीत सभा

अंबाजोगाई: संगीत साधना मंचच्या वतीने आयोजित अंबाजोगाईत नुकत्याच झालेल्या तृतीय मासिक संगीत सभेत परभणी येथील प्रख्यात गायक कृष्णराज लव्हेकर यांनी प्रारंभी राग मुलतानी मधील विलंबित ख्यालाचे सादरीकरण केले. मेवाती घराण्याची मिळालेली तालीम त्यांच्या गायनातून प्रसन्न चित्ताने प्रकट होत होती. ख्याल गायकीचे संपूर्ण विस्तृत दर्शन मुलतानी रागाच्या माध्यमातून रसिकांना घडविले. त्यानंतर लव्हेकर यांनी राग शंकरा मधील मध्य लय तीन तालातील सुरेख बंदिश सादर केली. तसेच मर्मबंधातली ठेव हे नाट्यगीत आणि शतजन्म शोधताना हे पद गावुन संगीत सभेचा समारोप केला. रत्नदीप शिगे यांनी तबल्यावर तर संवादिनीवर मातृस्वर संगीत विद्यालयाचे संचालक विश्वजीत धाट यांनी साथ संगत केली. स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहात झालेल्या संगीत सभेसाठी शहरातील संगीत साधक,पालक,रसिक महिला,नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# स्मार्ट फोनच्या जमान्यात उन्हाळी सुट्टीतील मामाचे गाव हारवले

ज्योतिराम पाढंरपोटे

माजलगाव:-लहान मुलांकडून पालकांच्या वाढलेल्या अपेक्षा, शैक्षणिक बदलामुळे उन्हाळ्याच्या सुट्टीतही घेतल्या जाणार्या परीक्षा तसेच युवा पिढीला मोबाईल,कॉम्प्युटर व सोशल मीडियाचे लागलेले व्यसन यामुळे उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाचे गाव हरवत चालले असून,जुने पारंपरिक खेळी हद्दपार होत असल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात दिसून येत आहेत.

आज मोबाईलच्या युगामध्ये उन्हाळयाची सुट्टी लागली की,मामाच्या गावाला जायची ओढच राहिलेली नाही.त्यातच वेगवेगळ्या शैक्षणिक बोर्डाचे वेगवेगळे नियम यामुळे बच्चे कंपनीला सुट्टी अनुभवताच येत नाही.एक काळ असा होता की, एप्रिल महिन्यामध्ये परीक्षा संपतात कधी आणि शहराकडील मंडळी गावाकडे जातात कधी आणि गावाकडची असतील तर मामाकडे जायला आतुरच असायची. आज धावपळीच्या युगामध्ये मामाच शहरात येऊन राहिल्याने मामाकडे जाण्याचा प्रश्नच येत नाही.परंतू, उन्हाळ्याच्या सुट्टीच्या वेळेला ग्रामीण भागामध्ये पाणीटंचाईच्या मोठ्या झळा सोसाव्या लागतात, त्यामुळे मामादेखील गावाला जाण्याच्या फंदात पडत नाही.

मामाचं पत्र हरवलं अशा प्रकारचा खेळ बालपणी खेळला जायचा.पण आता मामाचे पत्र तर हरवलेच आहे. कारण आज तंत्रज्ञाच्या युगात पत्र काय असतं हे मुलांना माहीतच नाही. कारण मोबाईलच्या स्क्रीनमध्ये मुलं एवढी गुरफटलीत की,त्यामध्ये मामाचं पत्र पूर्णतःहरवूनच गेले आहे.शिवाय, उन्हाळ्याची सुट्टी लागली पण मामाच्या गावाला न जाता आता याच सुट्टीत जादा क्लासेस,व्हेकेशन क्लासेस,कॉम्प्युटर क्लासेस यांसह साहस शिबीर,समर कॅम्प यांसारखे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले असल्याने बरेच पालक आपल्या मुलांना उन्हाळी सुट्टीत मामाच्या गावाला पाठवण्याऐवजी अशा प्रकारच्या शैक्षणिक आणि बौध्दिक,साहसी शिबिरात पाठवणे पसंत करत आहेत.बालपणी लहान मुलांना वार्षिक परीक्षा कधी संपते आणि कधी एकदा मामाच्या गावाला जातोय अशा प्रकारची ओढ लागायची. मामाच्या गावाला जाऊन विविध प्रकारचे खेळ खेळणे, मौजमस्ती करणे आणि त्यातच जर मामाचे गाव ग्रामीण भागात असेल, तर आंबे, करवंदे, जांभळं आदी प्रकारची उन्हाळ्यात येणारी फळे झाडावर चढून किंवा झाडावरुन पाडून खायची मज्जाच काही वेगळी होती. मात्र,आता दिवसेंदिवस होत चाललेले बदल, वाढते शहरीकरण, यामुळे कमी होत चाललेल्या शेती, वाड्या,फळबागा यामुळे मामाच्या गावाला जाऊन ती मजा करण्याचे दिवस हळूहळू कमी होत चालल्याने अनेक पालक आपल्या मुलांना उन्हाळी सुट्टीतील विविध उपक्रमांमध्ये गुंतून ठेवत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.



### मुले कार्टून बघण्यात व्यस्त

लहान मुले मैदानी खेळ खेळण्यापेक्षा घरी टीव्हीवरील छोटा भीम, मोटु-पतलु आदी कार्टून बघण्यात व्यस्त असल्याचे दिसतात. मुलांना पारंपरिक खेळाकडे वळवणे गरजेचे आहे. मोबाईल, कॉम्प्युटर यामुळे मुलांची कार्यक्षमता कमी होत चालली आहे. त्यामुळे पालकांनी मुलांना मैदानी खेळ खेळण्यास प्रवृत्त करणे ही काळाची गरज आहे.



### विविध प्रकारचे शिक्षण मामाच्या गावी मिळते

शहरात मुलांना शेती, शेतीचे प्रकार, मातीचे प्रकार, पिकांची लागवड, झाडे फुले, फळे, विविध शेतीपूरक व्यवसाय, पक्षी, जनावरे, नाते संबंध, कुटुंब पद्धती हे सर्व पुस्तकी ज्ञान मामाचे गाव शिकवते.यासाठी कुठल्याही क्लासमध्ये किंवा शाळेमध्ये जाऊन शिक्षण घेण्याची गरज नसते. हे प्राथमिक शिक्षण मुलांना मिळणे गरजेचे आहे. आणि हे शिक्षण मामाच्या गावी नकळतपणे मिळते.

### मामाचे गाव व्यायाम शाळा

मामाचे गाव हे शिक्षणाबरोबर व्यायामशाळा सुद्धा आहे याठिकाणी मुले वडाच्या पारंब्याचा झोका खेळणे, आंब्याच्या झाडावर आंबे खाण्यासाठी चढणे, झाडावर सूरपारंब्या चा खेळ खेळणे, विटी-दांडू, पकडा- पकडी, सायकल यासारख्या खेळांमधून मुलांच्या शारीरिक तसेच मानसिक व्यायाम होतो.

मामाच्या गावाला जाऊन घराच्या समोरील अंगणात गोट्या,भवरे, सापशिडी,पत्ते, लंगडी,लपाछपी, यांसारखे खेळ खेळले जात.ते आता फक्त आठवणींपुरते मर्यादित राहिले आहेत.पूर्वीसारखे घरासमोर असणारे मातीचे अंगण आता फारसे पहायला मिळत नाहीत.

-आप्पासाहेब मुळे, पालक

# शेतकऱ्यांनी कापूस बियाण्यांच्या ठराविक वाणांचा आग्रह धरु नये

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात कापूस पीक क्षेत्र ४०.२० लाख हेक्टर आहे. कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार प्रति हेक्टर ४.२ पाकिटे बियाण्याची आवश्यकता असते. या क्षेत्राकरीता १ कोटी ७० लाख पाकीटाची आवश्यकता आहे. सर्व कंपन्यांचा आढावा घेतला असता साधारपणे १.७५ कोटी पाकीटे उपलब्ध आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात कापूस बियाण्याची कमतरता नाही. अमरावती व अकोला या जिल्ह्यात कापूस एक प्रमुख पीक आहे.तरी शेतक-यांनी कापूस बियाण्यांचा ठराविक वाणाचा आग्रह धरु नये असे आवाहन, पुण्याचे कृषि आयुक्तालयाचे संचालक विकास पाटील यांनी केले आहे.

अमरावतीमध्ये २.१२ लाख हेक्टर व अकोलामध्ये १.४६ लाख हेक्टर कापूस पीक क्षेत्र आहे. अमरावती जिल्ह्यात खरीप-२०२४ साठी १२ लाख व अकोला जिल्ह्यासाठी ९ लाख कापूस पॅकेट पुरवठयाचे नियोजन कृषी विभागाने केले आहे. आज अखेर अमरावतीमध्ये ६.७५ लाख व अकोल्यात ६.१५ लाख कापूस पॅकेट पुरवठा करण्यात आला आहे. व इतर इतर कापूस बियाण्याचा पुरवठा प्रगतीपथावर आहे. अजित-१५५ या वाणास दोन जिल्हयामध्ये शेतकऱ्यांची जास्त पसंती असते. परंतु सदरील वाणाची उपलब्धता या दोन जिल्ह्याकरीता मर्यादित असल्यामुळे सर्व शेतकऱ्यांना हा वाण मिळू शकत नाही. परंतु त्याच्या दर्जाचे इतर कंपनीच्या वाणांची उपलब्धता आहे. त्यामुळे शेतक-यांनी कापूस पीकाच्या ठराविक वाणाची मागणी करू नये याबाबत आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आलेले आहे. अजित सीड्स या कंपनीने कृषी विभागास दिलेल्या नियोजनानुसार अमरावतीमध्ये ७९१८० कापूस पॅकेट (नियोजन) पैकी ७९१८० कापूस पॅकेट पुरवठा केला आहे व अकोल्यामध्ये १५२००० कापूस पॅकेट (नियोजन) पैकी १५२००० कापूस पॅकेट पुरवठा केला आहे. केंद्र सरकारने खरीप २०२४ साठी कापूसचा दर ८६४ रुपये निश्चित केला आहे. कापूस बियाणे जादा दराने विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्र तसेच कापूस उत्पादक कंपनी यांचेवर कारवाई करण्याचे निर्देश संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांच्या मार्फत आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच काही ठिकाणी कापूस जादा दराने विक्री केली असल्याचे निदर्शनास आल्यानंतर कृषी विभागातील स्थानिक कृषी सहाय्यक यांच्या मदतीने संबंधित कापूस बियाण्याचे वाटप कृषि विभागाच्या कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्याचे नियोजन संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# चिमणी पाखरांसाठी चारा पाण्याची सोय

## चिमण्यांसह विविध पाखरांचा किलबिलाट वाढला

अंबाजोगाई। प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या परीसरात ग्रीन आर्मीच्या वतीने चिमणी पाखरांसाठी चारा पाण्याची सोय केली आहे. वड पिंपळ,लिंब, बकुळ,अशा अनेक वृक्षांची मोठ्या प्रमाणात लागवड असलेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या विस्तीर्ण परिसरात असलेल्या वृक्षांवर सकाळ व सायंकाळच्या वेळी सध्या पाखरांचा मोठ्या प्रमाणात किलबिलाट वाढला आहे.

संस्था परिसरातील वृक्ष,तटरक्षक भिंती,जमीन आदी ठिकाणी चिमणी पाखरांसाठी चारा पाण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे आता संपूर्ण परिसरात पाखरांचा चिवचिवाट वाढला आहे. टाकाऊ पासून टिकाऊ वस्तुंचा वापर करून पाखरांना पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. पाखरां प्रति सहानुभूती दर्शवून दिवसभरासाठी न चुकता ग्रीन आर्मीचे मार्गदर्शक कुलकर्णी यांच्या समन्वयातून नवनाथ गायकवाड,राहुल देशपांडे,अशोक पाटील व राहूल घाडगे यांच्यासह काही जण चारा पाण्याची सोय करत आहेत. आता संपूर्ण परिसरात सकाळी व सांयकाळी पाखरांचा किलबिलाट कानी पडत आहे.



आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे देणे लागतो ही भावना जोपासणे गरजेचे आहे ग्रीन आर्मीच्या वतीने योगेश्वरी शिक्षण संस्था परिसरात वृक्ष लागवड करून त्या वृक्षाचे संगोपन केले आजही ते चालुच आहे आता त्या वृक्षाचा आधार मानवाबरोबरच पशु पाखरांना होत आहे. विशेष म्हणजे रखरखत्या उन्हात पाखरांसाठी खाद्य व पाण्याची सोय केली हे कार्य गौरवास्पद असून याचे अनुकरण व्हायला हवे.

-चंद्रशेखर बर्दापुरकर

# ऑट्रोसिटीचृया गुन्ह्यातून आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मालीपारगाव येथील फिर्यादीने माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती की दिनांक २८ एप्रिल २०२४ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने आमच्या गावातून मिरवणूक कडली होती रात्री ९:३० वाजेच्य सुमारास गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मिरवणूक चालू असताना मी व आमचे गावातील काही महिला पाठीमागे असताना आमचे गावातील मराठा समाजाचे आरोपी पवन बालासाहेब कदम , जगदीश शिवाजी शिंदे,सखाराम नाथा मांडवगणे हे तिघे रस्त्याच्या कडेला उभे असताना अमचेकडे पाहून. हुर्रे करून शिट्या वाजू लागले आम्ही त्यांचेकडे पाहिले असता आम्हाला जातीवाचक शिवीगाळ करून माझे व माझ्या सोबतच्या महिलांच्या अंगावर त्यांच्या हातातील वाळू मुद्दाम फेकली व तेथून ते पळून गेले यावरू माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन माजलगाव येथे तिघांविरुद्ध कलम ३५४,३२३ भा. द.वी.व कलम ३(१)(), ३,(१)(),३(२)() अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधित कायद्यान्वये गु.र.न १२३/ २०२४ दाखल करण्यात आला होता.आरोपींनी सदर गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव यांच्या न्यायलायात जामीन अर्ज दाखल केला होता अटकपूर्व जमीन अर्जावर तिन्ही आरोपीचे वतीने केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला असून आरोपीचे वतीने ॲड. व्हीं.बी.लवटे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड आर.के गवते यांनी युक्तिवाद केला असून त्यांना ॲड.एस.बी.कुलकर्णी यांनी सहकार्य केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान कोणीही सहन करणार नाही: राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडून आमदार जितेंद्र आव्हाडांनी केलेली चूक अक्षम्य आहे. पोटात एक आणि ओठात एक ठेऊन महामानवाचा अपमान करण्याचे धाडस निषेधार्थ आहे. भारतीय इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंदोलनामुळे महाड येथील चवदार तळ्याला अनन्य साधारण महत्व आहे. अशा क्रांतिकारी स्थळावर जाऊन जितेंद्र आव्हाडांनी प्रसिद्धीच्या झोतामध्ये येण्यासाठी हि स्टंटबाजी केली. प्रसिद्धीच्या हव्यासापोटी डॉ. बाबासाहेबांचा फोटोही त्यांनी फाडला.

यापूर्वी अनेक थोर पुरुषांचा अपमान आव्हाडांनी केलेला आहे. देशातील कोणताही नागरिक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान कदापीही सहन करणार नाही. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला घटनेच्या कोणत्याही पदावर राहण्याचा अधिकारी नाही. जितेंद्र आव्हाड यांनी केलेली अक्षम्य चूक लक्षात घेता त्याचां तातडीने राजीनामा घेतला पाहिजे. अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केली. आज संघर्ष योद्धा भाजपा जनसंपर्क कार्यलय समोर बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने जितेंद्र आव्हाडांच्या पुतळ्याचे दहन करत निषेध व्यक्त केला. यावेळी नवनाथ शिराळे, बालाजी पवार, प्रमोद रामदासी, केशव बडे, अमोल वडतिले, बद्रीनाथ जटाळ, लालासाहेब पन्हाळे, राजू शहाणे, अनिल शेळके, बंटी भिसे, महेश सावंत, विलास काकडे, अश्विन शेळके, महादेव नैराळे, विशाल पाखरे, मनोज आगे, शफिक भाई काजी, राम चव्हाण, गणेश शेंडगे, सचिन जाधव, सचिन मस्के, स्वप्नील मस्के, रवींद्र कळसाने, राम बहिरवाळ, प्रल्हाद चित्रे, दिलीप डोंगर आदि उपस्थित होते.




# भारिप्रची ओळख म्हणजे मनात काम, कामात मन-डॉ.आलुरकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेत काम करणारा सेवक असो की प्राचार्य? सर्व घटक आम्हाला कुटुंब सदस्यासारखे वाटतात. निवृत्तीचा कार्यक्रम देखील आमच्यासाठी संस्कार देणारा असतो. इथे काम करणारा प्रत्येक कर्मचारी मनात काम, कामात मन याच भुमिकेतुन सेवा समर्पण करतो. लिपिक शिवराज पंदे यांनी कार्यालयात काम करताना घालुन दिलेला आदर्श तदनंतरच्या लोकांनी घ्यायलाच हवा या शब्दांत संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकरांनी शुभेच्छा देत पंदे कुटुंबियांचा सपत्नीक सत्कार केला.

खोलेश्वर महाविद्यालयातील लिपिक शिवराज पंदे यांच्या निवृत्ती निमित्ताने स्व.गोपीनाथ मुंडे सभागृहात सेवा गौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यात आलुरकर हे अध्यक्ष पदावरून बोलत होते. डॉ.कल्पनाताई चौसाळकर, विजयराव वालवडकर, राम कुलकर्णी, प्राचार्य डॉ.मुकूंद देवर्षी, मुख्य लिपीक शिवराज पंदे सपत्नीक उपस्थित होते. सुरूवातीला प्रतिमा पुजन झाल्यानंतर महाविद्यालयाच्या वतीने, कर्मचारी पतपेढीच्या वतीने पंदेचा सपत्निक सत्कार सन्मान चिन्ह देवुन गौरव करण्यात आला. प्रास्ताविक करताना प्राचार्य देवर्षीनी पंदे यांच्या कार्यशैलीचे कौतुक करत शिस्तबद्ध कर्मचारी चौकटीत राहुन त्यांनी केलेले काम भुषणावह असल्याचे सांगितले. यावेळी निवृत्त प्राध्यापक डॉ.गोपाळ चौसाळकर, डॉ.रविंद्र कुंबेफळकर, विजयराव कुलकर्णी, प्रा. प्रल्हाद तावरे, डॉ.रोहिणी अंकुश आदींनी कौतुकास्पद भाषणे केली. राम कुलकर्णी यांनी देखील भाषणात सांगितले की, शिवराज पंदे प्रामाणिक कर्मचारी ज्यांचं शिक्षण आणि संपुर्ण नोकरी याच महाविद्यालयात त्यामुळे त्यांच्याशी असलेला ऋणानुबंध आपलेपणाचा निश्चित म्हणावा लागेल. अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात डॉ.सुरेंद्र आलुरकरांनी बोलताना सांगितले की क्षेत्र कुठलेही असो अशी वेळ एक येतेच की आपल्याला थांबावे लागते. कार्य, कर्तव्य जबाबदारीतुन आपण जेव्हा बाजुला होतो त्यावेळी समाजातुन येणार्या प्रक्रिया किंवा पाठीमागे बोलणार्याचे तोंड आपल्याला आनंद देणारे असतात. कारण आपण केलेले कार्य तितकंच महत्वाचं असतं. स्वत:ची अडचण बाजुला ठेवुन आपल्या संस्थेत सर्व घटकांत काम करणारे असे अनेक आदर्श देणारी माणसं आहेत की त्यांनी स्वत्वापेक्षा संस्थेच्या हिताला संस्कार केंद्राच्या नावलौकिकालाच महत्व दिलेले आहे. आपल्यावर असलेली जबाबदारी आणि कर्तव्य सक्षमपणे पार पडली तर त्यातुन मिळालेला आनंद उर्वरीत आयुष्यात तणावविरहीत जाण्यासाठी कामी येतो. त्यामुळे शुद्ध कर्माने जगणे, त्याचे आयुष्य शेवटपर्यंत आनंददायी जावु शकते असा वैद्यकिय सल्ला त्यांनी समारोपाच्या भाषणात दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ग्रंथपाल तुळशीराम मुंडे यांनी केले तर आभार सेवक गणेश पांचाळ यांनी मानले. प्रा.शैलेष पुराणिक यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.



# बीडला पुन्हा राष्ट्रीय नेतृत्वाची संधी!

## महाजन-मुंडेंना शक्य झाले नाही,ते पंकजांना शक्य

**केज । प्रतिनिधी**

दिवंगत प्रमोद महाजन यांच्यानंतर गोपीनाथ मुंडे यांनी पाच वर्षाच्या अल्प काळात राष्ट्रीय राजकारणात आपला दबदबा निर्माण केला होता. पण दुसर्या खेपेला निवडून गेल्यानंतर ग्रामविकास मंत्री होताच अपघाती निधन झाले आणि दहा वर्षापासून बीडसह मराठवाडा राष्ट्रीय नेतृत्वासाठी चाचपडत आहे. पंकजा मुंडे यांच्या निमित्ताने पून्हा एकदा राष्ट्रीय नेतृत्वाची संधी जिल्ह्याच्या दारावर चालून आली आहे. भाजपातील पहिली पिढी वृध्दापकाळाकडे गेल्याने तरूण नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे. पंकजा यांची राजकीय क्षमता, लोकसमर्थन लक्षात घेता पुढे अनेक वर्ष नेतृत्व करू शकतात.





त्यामुळे महाजन-मुंडे यांना अकाली निधनामुळे राष्ट्रीय स्तरावर जे शक्य झाले नाही ते दिल्लीच्या राजकारणात पंकजांना शक्य होण्याची आशा असल्याने लोकसभेची हि निवडणूक राष्ट्रीय नेतृत्वाला जन्म देणारी ठरणार आहे असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

बीड जिल्हा सुरूवातीपासूनच राजकीय नेतृत्व करणारा राहिला आहे. सुरूवातीला डाव्या विचारसरणीचे बापुसाहेब काळदाते यांनी आपल्या अभ्यासु वकृत्वाने दिल्लीत वजन निर्माण केले होते. पण तत्वाशी तडजोड न करण्याच्या भूमिकेत त्यांना केंद्रीय मंत्रीपदाची संधी असतानाही त्यांनी नाकारली. त्यानंतर अंबाजोगाईतून भाजपचे काम करत प्रमोद महाजन यांनी ९०च्या दशकात दिल्ली गाठली. उत्कृष्ट भाषण शैली आणि संघटन या बळावर त्यांनी अल्पकाळात राष्ट्रीय राजकारणात मजबूत पाय रोवले. २५ वर्षाच्या अथक मेहनतीनंतर राष्ट्रीय राजकारणात प्रमोद महाजन यांचे स्थान अढळ झाले. दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये ते मंत्री तर पक्षाचे महासचिव म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. दिल्लीत प्रमोद महाजन यांच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे यांना एकतर्फी नेतृत्व करता आले. अटल बिहारी वाजपेयी यांच्यानंतर भावी पंतप्रधान म्हणून तरूण वयात महाजन यांची ओळख निर्माण झाली होती. मात्र अचानक २००६ साली त्यांची हत्या झाली. महाजन यांच्यानंतर भाजपने गोपीनाथ मुंडे यांना राष्ट्रीय उपाध्यक्ष करून दिल्लीच्या राजकारणात सक्रिय केले. २००९ च्या लोकसभा निवडणूकीतून मुंडे यांनी संसदेत प्रवेश केला. पहिल्यांदाच खासदार म्हणून गेल्यानंतर पक्षाने मुंडे यांना लोकसभेत उपनेता म्हणून पहिल्या बाकावर संधी दिली. अल्पकाळात मुंडे यांनीही आपल्या प्रभावी नेतृत्वाने दिल्लीच्या राजकारणात आपले स्थान निर्माण केले. २०१४ च्या निवडणूकीत निवडून गेले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या

पान ३ वर

## अल्पवयीन मेव्हणीवर अत्याचार, पोस्को कायद्यानव्ये गुन्हा

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील कौडगाव साबळा येथील अल्पवयीन मेव्हणीस गोड बोलून फूस लावून सतत एक वर्षांपासून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे.या प्रकरणी पीडिटीच्या आईच्या तक्रारीवरून सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार परळी तालुक्यातील कौडगाव साबळा येथील रहिवासी असलेल्या अल्पवयीन पीडित मुलीस नात्याने दाजी (बहिणीचा नवरा) असलेल्या नराधमाने गोड बोलून, फूस लावून मागील एक वर्षांपासून सातत्याने तिच्यावर अत्याचार केल्या.या प्रकरणाची कुठे वाच्यता केल्यावर जीवे मारण्याची धमकी दिली. घटनेला त्रासून पीडित अल्पवयीन मुलीने आपल्या आईस आपबीती सांगितली असता पीडितेच्या आईच्या फिर्यादीवरून सिरसाळा पोलीस ठाण्यात गुरनं ८७/२०२४ कलम ३७६, ३७६ (२) (फ),३७६ (२)(एन), ५०६ भादवी सह कलम ४,८,१२ पोस्को अधिनियम २०१२ अनव्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार झाला असून या प्रकरणात अधिक तपास ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक जाधव हे करत आहे.

## जयंत कुलकर्णी यांचे दु:खद निधन

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथील जयंत कुलकर्णी यांचे वयाच्या ४५ व्या वर्षी कावीळ या आजाराने दु:खद निधन झाले.

आष्टी तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथील इलेक्ट्रिकल व्यावसायिक असलेले जयंत कुलकर्णी यांना काही दिवसांपूर्वी कावीळ या आजाराने ग्रासले होते.त्यांचे बुधवारी वयाच्या ४५ व्या वर्षी निधन झाले.अंत्यंत शांत, संयमी,मनमिळाऊ असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.त्यांच्यावर बुधवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक भाऊ,बहीण,पत्नी एक मुलगी असा परिवार आहे.

## सर्व सामान्य माणसाच्या ऋणातून उतराई होण्यासाठी ज्योतीताईचा संवाद दौरा –राजेंद्र आमटे

### पिंपळगाव मजरा, म्हासापुर, खांडे पारगाव येथे उस्पूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या वर सर्व सामान्य माणसाने खूप प्रेम केलं. तो तळागाळातला मेटे साहेब वर प्रेम करणारा सर्व सामान्य माणूस जपण्यासाठी ज्योतीताई विनायकराव मेटे ताई यांचा संवाद दौरा आहे. लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी आयुष्यभर संघर्ष करत शून्यातून विश्व निर्माण केल पण सर्व सामान्य माणसाची नाळ सोडली नाही तोच माणूस जोडण्याचं काम शिवसंग्राम करत राहील आदरणीय ज्योतीताई विनायकराव मेटे यांचा संवाद दौरा बुधवार सायंकाळी ८ वाजता पिंपळगाव मजरा ९ वाजता म्हासपुर येथे



रात्री १० वाजता खांडे पारगाव येथे संवाद साधण्यात आला या वेळी शिवसंग्राम राष्ट्रीय अध्यक्ष ज्योतीताई विनायकराव मेटे, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायण काशिद, विधानसभा अध्यक्ष सुभाष जाधव, तालुका अध्यक्ष नवनाथ प्रभाळे,खरेदी-विक्री संघाचे संचालक गोपीनाथ बापू घुमरे, माजी सभापती ज्ञानेश्वर कोकाटे, किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, ह भ प किसन महाराज कदम, शिवनीचे सरपंच विजय सुपेकर, बीड तालुका उपप्रमुख सुनील कुटे,राजेंद्र माने, शिवसंग्राम नेते विक्रम शिंदे,शहर सचिव गोपीनाथ देशपांडे,युवा नेते मुकुंद गोरे, ऋषिकेश सुरवसे, शैलेश सुरवसे, बीड शहर विभाग प्रमुख हरिश्चंद्र ठोसर, वैभव जाधव,अनिलमामा मोरे हे उपस्थित होते.

## पोलीस अधिकाऱ्याला लुटणाऱ्यांच्या आवळल्या मुसक्या

### स्थानिक गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ०५/०५/२०२४ रोजी रात्री ११.३० वा. चे सुमारास बशिरगंज पोलीस कॉलनीचे समोरील रोडने बिंदुसरा पोलीस अधिकारी विश्रामगृह बीड येथे जात असतांना दोन अनोळखी इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्षे यांनी मोटार सायकलवर येवून वायरलेस विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. कृष्णा उत्तमराव हिस्वनकर वय ५६ यांना आडवुन बळजबीने त्यांचे हातातील दोन सोन्याच्या अंगठया व खिशातील नगदी पैसे व ब्लुटुथ संगणमताने लुटून घेवून मोटार सायकलवरुन पळून गेले होते. नमुद घटनेच्या अनुषंगाने पो.स्टे.बीड शहर येथे



गुरनं १०१/२०२४ कलम ३९२,३४ भादंवि अन्वये दिनांक ०७/०५/२०२४ रोजी गुन्हयाची नोंद झाली होती.

सदर गंभीर घटनेच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक,बीड यांनी पोलीस निरीक्षक श्री. संतोष साबळे स्था.गु.शा.यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी आदेश दिले होते. त्यावरुन पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांनी अशा प्रकारचे गुन्हे करणारे गुन्हेगारांची पध्दती नुसार अभिलेखावर असलेल्या आरोपींची विश्लेषण केले तसेच गुप्त बातमीदारा मार्फत माहिती घेतली असता सदरचा गुन्हा हा सुयोग उर्फ छोटया प्रधान रा.बीड याने त्याचे साथीदारासह केला असल्याबाबत खात्रीशिर माहिती मिळाली. त्यानंतर तात्काळ पोलीस निरीक्षक श्री. संतोष साबळे यांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस उप निरीक्षक श्री. श्रीराम खटावकर व त्यांचे पथकाला मार्गदर्शन करुन पुढील कार्यवाही करण्यासाठी आदेशीत केले.दिनांक २९/०५/२०२४ रोजी पोउपनि श्री.खटावकर व त्यांचे पथक हे वर नमुद आरोपी शोध घेत

पान ३ वर

## निवृत्तीवेतनधारक व कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांना ऑनलाइन धोकेबाजीपासून सावधतेचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा कोषागाराचे अधिनस्त सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंबनिवृत्तीवेतनधारक यांना ऑनलाइन धोकेबाजी पासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात येते की, कोषागारामार्फत निवृत्तीवेतनधारक यांना निवृत्तीवेतन / सुधारित निवृत्तीवेतन / कुटुंबनिवृत्तीवेतन तसेच निवृत्तीवेतन विषयक इतर लाभ प्रदान करण्यात येतात.

सदर लाभ प्रदान करताना कोणत्याही प्रकारे वसुलीबाबत किंवा प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेबाबत कोषागार कार्यालयामार्फत फोन करुन संपर्क साधला जात नाही किंवा ऑनलाईन व्यवहार करण्याविषयी सुचित केले जात नाही. कोषागार कार्यालयामार्फत फक्त लेखी स्वरुपात पत्रव्यवहार केला जातो.

याबाबत काही निवृत्तीवेतनधारकांना फोन करुन ऑनलाईन रक्कम भरल्यानंतर कोषागारातील थकीत रक्कम मिळणार असल्याचे सांगितले जाते आहे. याबाबतच्या तक्रारी कोषागार कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. अशा कोणत्याही प्रकारचा फोन जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत केला जात नाही किंवा कोषागार कार्यालयातील कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकांच्या घरी पाठविले जात नाही.

सर्व निवृत्तीवेतनधारक व कार्यरत कर्मचारी यांना आवाहन करण्यात येते की, आपणास दुरध्वनी / भ्रमणध्वनीवरुन उपरोक्त प्रदानासंदर्भात संपर्क साधुन रक्कम ऑनलाईन, गुगल पे, फोन पे किंवा इतर इलेक्ट्रानिक माध्यमाव्दारे भरणेबाबत जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत कळविले जात नाही. तरी कोणीही अशा दुरध्वनी संदेशावर प्रतिसाद देऊ नये. याबाबत निवृत्तीवेतनधारकांनी परस्पर रक्कम भरल्यास ती निवृत्तीवेतनधारकाची वैयक्तिक जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी. तसेच अशा प्रकारच्या दुरध्वनी प्राप्त झाल्यास कृपया कोषागार कार्यालयास अवगत करावे. तसेच कोणतेही व्यवहार करण्यापुर्वी अथवा शंका असल्यास प्रथमतः कोषागार कार्यालयाशी संपर्क साधण्यात यावा. असे आवाहन बीड जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत जिल्हा कोषागार अधिकारी श्री. महेश वि. बाब्रस व अप्पर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) श्री. राजेंद्र जोरे यांचे कडुन करण्यात येत आहे.

## कृष्णराज लव्हेकर यांनी घडविले ख्याल गायकीचे विस्तृत दर्शन

### संगीत साधना मंचची मासिक संगीत सभा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संगीत साधना मंचच्या वतीने आयोजित अंबाजोगाईत नुकत्याच झालेल्या तृतीय मासिक संगीत सभेत परभणी येथील प्रख्यात गायक कृष्णराज लव्हेकर यांनी प्रारंभी राग मुलतानी मधील विलंबित ख्यालाचे सादरीकरण केले. मेवाती घराण्याची मिळालेली तालीम त्यांच्या गायनातून प्रसन्न चित्ताने प्रकट होत होती. ख्याल गायकीचे संपूर्ण विस्तृत दर्शन मुलतानी रागाच्या माध्यमातून रसिकांना घडविले. त्यानंतर लव्हेकर यांनी राग शंकरा मधील मध्य लय तीन तालातील सुरेख बंदिश सादर



केली. तसेच मर्मबंधातली ठेव हे नाट्यगीत आणि शतजन्म शोधताना हे पद गावुन संगीत सभेचा समारोप केला. रत्नदीप शिगे यांनी तबल्यावर तर संवादिनीवर मातृस्वर संगीत विद्यालयाचे संचालक विश्वजीत धाट यांनी साथ संगत केली. स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहात झालेल्या संगीत सभेसाठी शहरातील संगीत साधक,पालक,रसिक महिला,नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## शनैश्वर जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन

**परळी । प्रतिनिधी**

परळी येथील शनिमंदिर देवस्थान ट्रस्ट च्यावतीने शनैश्वर जन्मोत्सवा निमित्ताने विविध धार्मिक, सामाजिक, आरोग्य विषयक कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार (ता.३१) ते शुक्रवार (ता.०७) करण्यात आले आहे.

येथे दरवर्षी शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर व सिध्दलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या प्रेरणेने अखंड शिवनाम सप्ताह, श्री.ग्रंथराज परमरस्य पारायण सोहळा आयोजित केला जातो. यावर्षी अखंड शिवनाम सप्ताहाची सुरुवात शुक्रवारी (ता.३१) ते शुक्रवार (ता.०७) पर्यंत करण्यात आले आहे. यानिमित्ताने विविध धार्मिक, सामाजिक, आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहेत. गुरुवारी (ता.०६) संध्याकाळी ७ वाजून १४ मिनिटांनी शनैश्वर जन्मोत्सव साजरा होईल, यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी हा महाप्रसाद शनिमंदिर मध्ये होणार आहे. त्याचबरोबर शुक्रवारी (ता.३१) सकाळी ८ वाजता शोभायात्रा हनुमान मंदिर मोंढा येथून



राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक मार्गे शनी मंदिरात काढण्यात येणार आहे.तसेच रविवारी (ता.०२) भव्य रक्तदान शिबीर सकाळी आठ ते पाच यावेळेत आयोजित केले आहे. धार्मिक कार्यक्रमात रोज सकाळी शिवपाठ, परमरस्य पारायण, शनि महात्म्य पारायण, गाथा भजन, प्रवचन आदि कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या सर्व कार्यक्रमास पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री. शनिमंदिर देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत नेहा सिरसट व भाग्यश्री सिरसटला सुवर्ण पदक यशाचे सर्वत्र कौतूक

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

नेपाळ मध्ये झालेल्या १५ वी नेपाळ




शोतोकन कराटे असोशिएशन चे आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत धारूर येथील नेहा शामराव सिरसट व भाग्यश्री संतोष सिरसट यांनी वेगवेगळया गटात सुवर्ण पदक मिळवले असून या बहीणीचे या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

धारूर येथील कराटे खेळाडु असणा-या नेहा शामराव सिरसट वं भाग्यश्री संतोषराव सिरसट या नेपाळ मध्ये झालेल्या १५ वी नेपाळ शोतोकन कराटे असोसिएशन चे आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत खेळण्या साठी गेले होत्या ५० वर्ष वजन गटात नेहा शामराव सिरसट हिने उत्कृष्ट प्रदर्शन करत सुवर्ण पदक मिळवले. तर खुल्या गटात भाग्यश्री संतोषराव सिरसट हिने उत्कृष्ट प्रदर्शन करत सुवर्ण पदक मिळवले व आंतरराष्ट्रीय पातळीवर कराटे स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.यादोन्ही नवोदीत कराटे खेळाडूनी आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्ण पदक मिळवलेया दोन्ही खेळाडूचे यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे. या कराटे खेळाडूना प्रशिक्षक राम नेमाटे यांनी मार्गदर्शन केले या यशस्वी दोन्ही कराटे खेळाडूचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## पोलीस दलातील श्वान टोरसमुळे घरफोडीच्या गुन्ह्याची उकल

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव शहरामध्ये झालेल्या घरफोडीनंतर पोलीस दलातील श्वान टोरस याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या श्वान टोरसमुळे घरफोडीच्या गुन्ह्याची उकल झाली असून चोरटा जेरबंद करण्यास पोलीस विभागाला यश आले आहे.



पो.स्टे. माजलगाव शहर गु.र.नं. १९३/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी. मधील गुन्हा उघडकीस आनण्यासाठी पोलीस दलातील श्वान टोरसला गुन्ह्याचे घटनास्थळी अज्ञात आरोपीने हाताळलेले फीर्यादीचे कपाटातील सोण्याचे दागीने ठेवण्याचे पाउच पॉकेट चा वास दिला असता श्वान टोरसने सदर घरातुन बाहेर येवून फीर्यादीचे घराचे उजवीकडे वळून घरासमोरील रस्त्याने पश्चिम दिशेस असलेल्या श्री माने यांचा वाडा तसेच बाजुस असलेली जय महेश कांदा मिरची चटणी व पीठाचे गीरणीचे दारासमोर फीरुन वास घेवुन इशारा केला त्यावरून पोलीसांनी तेथे असलेला संशयीत नामे हर्षद ज्ञानेश्वर माने याला ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी केली असता त्याने गुन्हाची कबुली दिली. नमुद आरोपी कडुन ३,८०,०००/- रुपेय किमतीचे साडे सहा तोळे सोण्याचे दागीणे जप्त केले आहेत.

## सप्तखंजरीवादक सत्यपाल महाराजांच्या समाजप्रबोधन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन –प्रा.दत्ताभाई प्रभाळे

**बीड । प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ वी जयंतीनिमित्त समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमास प्रबोधनकार, पुरोगामी किर्तनकार, समाजसुधारक सत्यपाल महाराज एकाच वेळेस सात वाद्य वाजवून बुद्ध, शिव, होळकर, फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार अत्यंत प्रामाणिकपणे, तळमळीने, निष्ठेने, निस्वार्थ भावनेने घरोघरी पोचविणारे हसता-हसता लोकप्रबोधन करणारे आधुनिक संत सत्यपाल महाराज यांच्या या समाजप्रबोधनाच्या कार्यक्रमास बीड शहर व शिदोड परिसरातील सर्व समाजबांधवांनी आवर्जून उपस्थित राहावे. सप्तखंजिरी वादक, प्रबोधनकार श्री.सत्यपालजी महाराज यांनी गेल्या ५० वर्षांपासून सत्यपाल महाराज



आपल्या कीर्तनातून समाजप्रबोधनाचे काम करीत आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांच्या विचारांचा वारसा सत्यपाल महाराजांनी पुढे नेला आहे. सत्यपाल महाराजांचे कीर्तन म्हणजे सर्वांसाठी एक पर्वणीच असते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांच्या जीवनाचे विविध पैलू समजून घेता आले. सत्यपाल महाराज यांच्या भेटीतून नेहमीच एक वेगळी ऊर्जा प्राप्त होते. आपणांस कळविण्यात अत्यंत आनंद

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शहरातून दर दोन दिवसाला होताहेत १७ जण बेपत्ता; विशीतल्या तरुणींचे प्रमाण धक्कादायक

पिंपरी-चिंचवड शहरातून दर दोन दिवसाला सरासरी १७ जण बेपत्ता होत आहेत. त्यातील मिळून येणाऱ्यांची संख्या तोकडी असल्याने बेपत्ता होणाऱ्या व्यक्ती जातात कुठे असा प्रश्न उपस्थित होत आहे. चालू वर्षात जानेवारी ते मे या कालावधीत १२७७ जण शहरातून बेपत्ता झाले आहेत. यामध्ये विशीतल्या तरुणींची संख्या धक्कादायक आहे. गेल्या पाच महिन्यात २० पेक्षा कमी वय असलेल्या बेपत्ता तरुणींची संख्या १८६ आहे. बेपत्ता झालेल्या नागरिकांना शोधण्यासाठी पोलिसांकडून मिसिंग ड्राइव्ह नावाने मोहीम राबवली जाते. मात्र मागील काही महिन्यांपासून अशी मोहीम देखील राबविण्यात आलेली नाही.

स्मृतिभ्रंश आणि यासारख्या इतर आजारांमुळे नागरिकांचे स्वतःवर नियंत्रण राहत नाही. ते अचानक बाहेर पडतात आणि बेपत्ता होतात. रावेत पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एक वृद्ध व्यक्ती दळण आणण्यासाठी घराबाहेर पडली आणि बेपत्ता झाली. पोलिसांच्या सतर्कतेमुळे हिंजवडी परिसरात तिचा शोध लागला आणि तब्बल १६ तासानंतर वृद्ध व्यक्ती घरी परतल्याची घटना शहरात घडली होती. आई-वडिलांच्या भांडणात मुलांचा ताबा मिळविण्यासाठी पालकांकडून एकमेकांच्या परवानगीशिवाय मुलांना नेले जाते. अशा प्रकरणात देखील मुलांच्या बेपत्ता होण्याची तक्रार नोंदवली जाते.

देहूरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन लहान मुले बेपत्ता झाल्याचे प्रकरण घडले होते. पोलिसांनी अवघ्या चोवीस तासात त्यांचा शोध लावला. पण त्या मुलांचे बेपत्ता होण्याचे कारण ऐकून पोलिसांनी चक्क डोक्याला हात लावला. देहूगावात राहणारी आठ आणि सहा वर्षांच्या दोन्ही भावांना आळंदी पाहण्याची इच्छा झाली म्हणून त्यांनी आई वडील घरी नसताना घर सोडले होते.

प्रेमविवाह करण्यासाठी जोडीदारासोबत पळून जाणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. अल्पवयीन मुले देखील अशा कारणासाठी घराचा उंबरा ओलांडतात. मात्र परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येताच ही मुले असतील तेथून घरचा रस्ता धरतात. विवाहित महिला देखील वेगवेगळ्या कारणांसाठी कुटुंबाला सोडून निघून जातात. यावर्षी जानेवारी महिन्यात २५२, फेब्रुवारी महिन्यात २१७, मार्च महिन्यात २७०, एप्रिल महिन्यात २७२ आणि मे महिन्यात २६६ जण बेपत्ता झाले आहेत.

मिसिंग ड्राइव्ह सातत्याने राबविण्याची गरज मागील दोन वर्षांपूर्वी भोसरी पोलिसांनी बेपत्ता व्यक्तींना शोधण्यासाठी मिसिंग ड्राइव्ह राबवला. यात २०० पैकी १५५ बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले. अशा मोहिमा आयुक्तालय स्तरावर वारंवार राबविण्याची गरज आहे. यामुळे अनेक व्यक्ती लवकर घरी येण्यास मदत होते.वर्षभरात तब्बल २६८३ जण बेपत्ता मागील वर्षी सन २०२३ मध्ये पिंपरी-चिंचवड शहरातून दोन हजार ६८३ लोक बेपत्ता झाल्याची पोलीस दप्तरी नोंद आहे. हीच आकडेवारी सन २०२२ मध्ये दोन हजार ६७१ एवढी होती. त्यात मिळून येणाऱ्या व्यक्तींची संख्या नगण्य आहे.

अल्पवयीन मुलीचे प्रमाण धक्कादायक बेपत्ता होणाऱ्यांमध्ये १८ वर्षांहून कमी वय असलेल्या मुलींची संख्या धक्कादायक आहे. पिंपरी-चिंचवड शहर पोलीस हद्दीतून जानेवारी महिन्यात ६, फेब्रुवारी महिन्यात १२, मार्च महिन्यात १४, एप्रिल महिन्यात ७, मे महिन्यात ११ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या आहेत. उमलत्या वयात प्रेमाची झिंग चढते आणि कोवळ्या वयातल्या मुली काहीच दिवसांपूर्वी ओळख झालेल्या त्याच्यासोबत जाण्यास तयार होतात. त्यामुळे पालकांनी देखील याकडे लक्ष देऊन मुलांचे समुपदेशन केले पाहिजे. पालकांसोबत झालेले वाद देखील घर सोडून जाण्यास कारणीभूत ठरतात. त्यामुळे आपल्या पाल्याला विश्वासात घेऊन प्रत्येक गोष्ट समजावून सांगणे आवश्यक आहे.

पुरुषांपेक्षा महिलांचे प्रमाण अधिक बेपत्ता होणाऱ्यांमध्ये पुरुषांपेक्षा अधिक महिला बेपत्ता झाल्या आहेत. मागील पाच महिन्यात पिंपरी-चिंचवड शहर आयुक्तालयाच्या हद्दीतून ५९२ पुरुष बेपत्ता आहेत. तर ६८४ महिला बेपत्ता झाल्या आहेत. मे महिन्यात एक तृतीयपंथी देखील बेपत्ता झाल्याची नोंद आहे.

# आधी नदीपात्रात राडारोडा, आता सपाटीकरण : प्रशासनाची डोळेझाक



कसबा पेठ । प्रतिनिधी

पुणे शहराच्या मध्यवर्तीत भागात असणार्या पालिकेसमोर शनिवार पेठ परिसरातील नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर राडारोडा टाकला जात आहे. त्यामुळे नदीचे विद्रुपीकरण होत असल्याचे अनेकदा समोर आले आहे. काही दिवसांपूर्वी त्याच परिसरात पुन्हा मोठ्या प्रमाणावर राडारोडा टाकण्यात आला. त्याविषयी स्थानिक नागरिकांकडून जाब विचारला असता, तो राडारोडा उचलून त्याची विल्हेवाट लावण्याऐवजी त्याच ठिकाणी त्याचे सपाटीकरण करण्यात आले.

त्यामुळे मोठा पाऊस झाल्यास तो राडारोडा नदीपात्रात जाऊन पाण्याला अडथळा ठरू शकतो. अशा गोष्टींकडे महापालिका प्रशासन, संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असून, त्या ठिकाणी कामावर असणारे कर्मचारी यासंबंधी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत. त्यामुळे नदीपात्राचे सुभोभीकरण नव्हे, तर विद्रूपीकरण सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. महापालिकेच्या समोरच अशा घटना घडत असूनही अधिकारी जाणून बूजून याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. खडकवासला धरणातून पाण्याच्या विसर्गाला सुरुवात झाल्यावर नदीपात्रातील पाणी थेट रस्त्यावर येते. आपटे घाट परिसरात ठिकठिकाणी टाकण्यात आलेल्या या राडारोड्यामुळे पूरस्थिती निर्माण होण्यासाठी भरच पडली आहे.

कर्मचार्यांचे कामकाज आठ तास असते. रात्री १० पर्यंत आमचे कर्मचारी कामावर असतात. लोकांकडे कचरा व राडारोडा टाकण्यासाठी २४ तास असतात. आम्ही २४ तास त्यांच्यावर लक्ष ठेवू शकत नाही. रात्री-अपरात्री कुणीतरी हा राडारोडा टाकला आहे.

– नंदकुमार महांगरे, आरोग्य निरीक्षक, कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालय

शनिवार पेठेतील आपटे घाट परिसरातील मुठा नदीपात्रात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात राडारोडा आणि कचरा टाकल्यामुळे नदीचे पात्र अरुंद झाले आहे. त्यामुळे पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला आहे. महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने या राडारोडा व कचरा टाकणार्यांवर कारवाई करा.

– संजय पायगुडे, सामाजिक कार्यकर्ते

# उत्तराखंड येथील चारधाम यात्रेसाठी नोंदणी अनिवार्य

**पुणे । प्रतिनिधी**

उत्तराखंड येथील चारधाम यात्रा-२०२४ साठी यात्रेकरुंच्या संख्येत सतत होत असलेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर यात्रेकरुंसाठी https://registrationandtouristcare.uk.gov.in/ या संकेतस्थळावर नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली असून नोंदणी अनिवार्य असल्याचे उत्तराखंडच्या मुख्य सचिवांनी कळविले आहे.

चारधाम यात्रेच्या सुरुवातीच्या आठवड्यात यात्रेकरुंची प्रचंड गर्दी झाल्यामुळे विविध समस्या निर्माण झाल्या होत्या. त्या अनुषंगाने धाम येथील दर्शनाची प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी शासनाने उत्तराखंडने चारधाम यात्रेसाठी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली आहे. ज्या तारखेसाठी संबंधित धामांच्या ठिकाणी दर्शनाची नोंदणी केली असेल त्या तारखेलाच दर्शनाची परवानगी असेल. वृद्ध आणि अगोदरपासूनच वैद्यकीय स्थिती अस्तित्वात असलेल्या भाविकांनी त्यांची यात्रा सुरू करण्यापूर्वी स्वतःची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. तसेच उत्तराखंड सरकारच्या वैद्यकीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाने जारी केलेल्या https://health.uk.gov.in/pages/display/140-charadham-yatra-health-advisory या लिंकवरील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे, असेही उत्तराखंड प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# पुणे हिट अँड रन प्रकरण : ते ब्लड सॅम्पल फक्त आरोपीच्या आईचे नाही तर, डॉ. सापळेंच्या अहवालातून धक्कादायक माहिती समोर

पुणे : पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणात रोज नवनवीन माहिती समोर येत आहे. चाचणीसाठी पाठविलेले रक्ताचे नमुने अल्पवयीन आरोपीचे नसल्याचं काही दिवसांपूर्वी समोर आलं. त्यानंतर, रक्ताचे नमुने ससून रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी बदलल्याचा आरोप झाला. आता हे बदललेले रक्ताचे नमुने कोणाचे आहेत, याविषयी डॉ. पल्लवी सापळे यांनी बनवलेल्या अहवालातून मोठी माहिती समोर आली आहे. अल्पवयीन आरोपीऐवजी ससून रुग्णालयात त्याच्या आईचे ब्लड सॅम्पल घेतलं असल्याची माहिती आता अधिकृतरित्या समोर आली आहे.

कल्याणी नगर अपघात प्रकरणात डॉ. पल्लवी सापळेंनी बनवलेल्या अहवालात धक्कादायक माहिती समोर आली आहे. अल्पवयीन आरोपीऐवजी ससून रुग्णालयात त्याच्या आईचे ब्लड सॅम्पल घेतलं असल्याची माहिती आता समोर आली आहे. ससून हॉस्पिटलचे डॉक्टर श्रीहरी हारनोळ यांनी एकूण तीन जणांचे ब्लड सॅम्पल घेतल्याची माहिती समोर आली आहे. याबाबतचे वृत्त एका वृत्तवाहिनीने दिले आहे.

अल्पवयीन आरोपीची आई आणि बिल्डर विशाल अगरवालची पत्नी शिवानी अगरवाल हिच्यासह दोन वृद्धांचे ब्लड सॅम्पल घेतल्याची माहिती समोर आली आहे. ब्लड सॅम्पल फेरफार करुन अल्पवयीन आरोपीच्या नावाखाली चाचणीसाठी पाठवल्याचा आरोप होत आहे. आरोपीच्या आईवरतीही कारवाईची शक्यता असून आईची चौकशी झाल्याचे वृत्त काही प्रसारमाध्यमांनी दिले आहे.

मागील काही काही दिवसांपासून ब्लड सॅम्पल बदलल्याच्या बाबतीत अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. त्यानंतर हे ब्लड नेमकं कोणाचं होतं, यासंदर्भात अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत होते. हे रक्त कोणाचे होते हे समोर आले नव्हते. मात्र, डॉ. पल्लवी सापळे यांच्या समितीने ससूनमधील चौकशीचा अहवाल बनवला आहे, यातून अनेक महत्त्वाच्या बाबीर समोर आल्या आहेत.

अल्पवयीन आरोपीचे ब्लड सॅम्पल बदलण्याच्या उद्देशाने ससूनचे डॉ. श्रीहरी हरनोळ यांनी एकूण तीन जणांचे ब्लड सॅम्पल घेतल्याची बाब समोर आली आहे. यामध्ये एका महिलेचे रक्त होते तर दुसरे दोन वृद्ध व्यक्तीचे आहे, असं या अहवालात नमुद करण्यात आले आहे. त्यामुळे हे महिलेचे रक्त अल्पवयीन आरोपीचे असल्याचे सांगण्यात येत आहे. याच महिलेचे रक्त पुढे तपासणीसाठी देण्यात आलं होतं. त्यामुळे अल्पवयीन आरोपीच्या वडीलांच्या रक्तासोबत मॅच झालं नाही. त्याचा डीएनए जुळला नाही. त्यानंतर आरोपीचे रक्त घेण्यात आले आणि ते त्याच्या वडीलांसोबत मॅच झालं. त्यामुळे हा प्रकार उजेडात आला आहे. यानंतर तिघांना अटक केली आहे.

# पिंपरी चिंचवड येथील २५० मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात

पुणे । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड येथील २५० मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह येथे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली असून इच्छुकांकडून प्रवेशासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

या वसतिगृहात बाहेरगावाकडील परंतु पुणे, पिंपरी चिंचवड, मोशी प्राधिकरण परिसरात शिक्षण घेणाऱ्या गरीब होतकरू अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग, अनाथ असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना विनामूल्य निवास व भोजन, पुस्तके, स्टेशनरी व निर्वाह भत्ता दरमहा ९०० रूपये आदी सुविधा पुरविण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांनी अर्जासोबत गुणपत्रिका, पालकांचा उत्पनाचा दाखला, जातीचा दाखला, विद्यार्थ्याचया व त्याच्या वडिलांच्या आधार कार्डची प्रत, रहिवाशी दाखला, रेशन कार्डची छायांकित प्रत, बोनाफाईड इत्यादी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांनी व पालकांनी २५० मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पिंपरी - चिंचवड सेक्टर-४, स्पाईनरोड, संतनगर, पथ क्रमांक -८, क्वार्ड हॉस्पिटल शेजारी, मोशी प्राधिकरण - ४१२१०५ येथे संपर्क साधून प्रवेश अर्ज घेऊन परिपूर्ण भरून द्यावेत, असे आवाहन वसतिगृहाच्या गृहप्रमुखांनी केले आहे.

# रिक्षा ३० हजाराची अन् दंड चक्क सव्वा लाख; 'त्या' नियमाला रिक्षा चालक वैतागले



पुणे : वाहनांना फिटनेस प्रमाणपत्र देताना विलंब झाल्यास प्रत्येक दिवसाला ५० रुपयांचे विलंब शुल्क आकारले जात आहे. जुन्या रिक्षांना हा दंड म्हणजे जिल्ह्यापेक्षा तालुका मोठा अशी स्थिती होत आहे. एका रिक्षाची सध्याची बाजारभावानुसार किंमत अवघी ३० हजार रुपये असताना तिला उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने १ लाख ३५ हजार रुपये दंड आकारला आहे. तर नूतनीकरणासाठीचा हा दंड रद्द करण्याची मागणी ऑटोरिक्षा संघटना संयुक्त महासंघाने राज्याच्या परिवहन आयुक्तांकडे केली आहे.

जुन्या वाहनाच्या नूतनीकरणासाठी विलंब केल्यास दररोज ५० रुपयांचा दंड आकारला जातो. मोठी चारचाकी वाहने आणि रिक्षासारखी छोटी वाहने यांनाही एकसारखाच दंड आकारला जात आहे. या आकारणीला मुंबई बस मालक संघटनेने उच्च न्यायालयात याचिके द्वारे आव्हान दिले होते. पण न्यायालयाने याचिका फेटाळून लावताना परिवहन विभागाची दंडाची कारवाई योग्य ठरवली होती. त्याच्या आधारे ७ मेपासून दंड आकारणी सुरु झाली आहे.

आंदोलनाचा इशारा

ऑटो रिक्षा महासंघाने परिवहन आयुक्तांना याप्रकरणी निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे. बस मालकांची याचिका गेल्या महिन्यात निकाली काढण्यात आल्यानंतर लगेच परिवहन विभागाने दंड आकारणी सुरु केली आहे. यादरम्यान, २०१९मध्ये केंद्रीय सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने नवी वाहतूक अधिसूचना काढली आहे. त्यामुळे सध्याचे दंडाचे परिपत्रक निरर्थक ठरले आहे. मंत्रालयाने वाहनांसाठी श्रेणीनुसार वेगवेगळे दंड निश्चित केले आहेत. त्यामुळे रिक्षांना दररोज ५० रुपये दंड आकारु नये, अन्यथा राज्यातील प्रत्येक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयासमोर आंदोलने केली जातील, असा इशारा ऑटो रिक्षा महासंघाचे अध्यक्ष महेश चौगले यांनी परिवहन आयुक्तांना दिला आहे.

स्टे उठवला, दंड आकारणी सुरू

केंद्र शासनाने २०१६ मध्ये एक सर्क्युलर काढून ज्या वाहनांचा फिटनेस संपला आहे, अशा व्यावसायिक वाहनांना दरदिवशी ५० रुपये प्रमाणे दंड लागू केला होता. परंतु काही संघटना हायकोर्टामध्ये गेल्या होत्या. हायकोर्टाने या याचिकांची दखल घेऊन परिपत्रकाला स्टे दिला होता. आता २०२४ मध्ये हायकोर्टाने त्याच्यावरचा स्टे उठवल्यामुळे परत दंड आकारण्यास सुरुवात झाली आहे, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी व्ही व्ही सगरे यांनी दिली आहे.

# सांगवी परिसर गोळीबाराने हादरला! हल्लेखोरांकडून रेकॉर्डवरील गुन्हेगाराचा खून

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

शहरातील सांगवी परिसरात दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी तरुणावर गोळीबार करुन खून केल्याची घटना बुधवारी (दि.२९) रात्री पावणे दहाच्या सुमारास घडली. नवी सांगवीतील माहेश्वरी चौकाजवळ इंद्रप्रस्थ गृहनिर्माण सोसायटीसमोर मुख्य रस्त्यावर हा प्रकार घडला आहे. मात्र नेमके कारण समजू शकले नाही.

दीपक दत्तात्रय कदम (वय-३० रा. जयमालानगर, जुनी सांगवी) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. दीपक याच्यावर गोळीबार करुन मारेकरी पळून गेले. दरम्यान, २०१४ मध्ये संतोष काची यांच्या खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दीपकसह त्याच्या इतर सात ते आठ जणांवर दाखल आहे. गोळीबारानंतर जखमी अवस्थेत दीपक रस्त्यात पडून होता. घटनेची माहिती मिळताच सांगवी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्याला तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सांगवी परिसरातील शंकराच्या पुतळ्यापासून काही अंतरावर अज्ञात हल्लेखोरांनी समोरुन दीपक याच्या तोंडावर गोळ्या झाडल्या. यात गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला. गोळीबार करणारे व्यक्ती कोण होते, हे समजू शकलेलं नाही. या घटनेनंतर सांगवीसह पिंपळे गुरव भागात खळबळ माजली आहे. पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

# मोबाईल वापरत नव्हता, खून करुन फरार झालेला आरोपी असा आला ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील आंबेगाव बुद्रुक येथे जमिनीच्या वादातून खून करून पसार झालेला आरोपीला भोर तालुक्यातून अटक करण्यात आली. घटनेनंतर सीसीटीव्ही कॅमेरे आणि गोपनीय माहितीच्या आधारावर भारती विद्यापीठ पोलिसांनी आरोपी संतोष ऊर्फ पप्पु पाबेकर याला अटक केली. विशेष म्हणजे खून करुन फरार झालेला आरोपी कोणताही मोबाईल वापरत नव्हता. यामुळे त्याचे लोकेशन शोधणे अवघड होत होते.




आंबेगाव बुद्रुक येथे ५ मे रोजी सकाळी ११ वाजता खून झाला होता. कात्रज ते नवले ब्रिजकडे जाणाऱ्या रस्त्यावर दत्तनगर बस स्टॉपजवळ हायवेलगत विलास जयवंत बांदल (वय ५५) यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात भारती विद्यापीठ पोलिसांनी त्वरित कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. जमिनीच्या वादातून हा खून झाला होता. यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आणि सीसीटीव्ही कॅमेरे आणि गोपनीय माहितीच्या आधारावर आरोपी संतोष ऊर्फ पप्पु पाबेकर (वय ४५) याला शोधून काढले.

ही होती अडचण

आरोपी कोणताही मोबाईल फोन वापरत नसल्यामुळे त्याला पकडण्यास अडचण निर्माण होत होती. मात्र, वरिष्ठ पोलिस निरीक्षक डी.एस. पाटील यांनी चार वेगवेगळ्या टीम तयार करून शोध घेण्याच्या सूचना दिल्या. यानंतर पोलिसांना आरोपी रावडी (ता. भोर) येथे त्याच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी आला आहे, अशी माहिती मिळाली.

# देहूफाटा येथील रस्ता अडवू नये: जिल्हाधिकारी दिवसे

देहूगाव : देहूरोड येथील देहू फाटा येथे संरक्षण विभागाच्या वतीने बॅरिकेड्स लावून रस्ता अडविण्यात आला आहे. यासंदर्भात संरक्षण विभागाच्या अधिकार्यांशी चर्चा केली आहे. हा सार्वजनिक रस्ता असून संरक्षण विभागाने या ठिकाणी कुणाची अडवणूक करू नये. लवकरच संरक्षण विभागाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ यांची बैठक घेऊन पुढील निर्णय घेतला जाईल. तोपर्यंत बॅरिकेट लावून वाहनांची अडवणूक करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी देहूगाव येथे बुधवारी केले.



देहू देवस्थानच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीत जिल्हाधिकारी सुहास दिवसे, उपजिल्हाधिकारी संजय असवले, तहसीलदार जयराज देशमुख, नायब तहसीलदार प्रवीण ढमाले, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदुलकर, गणेश दानी, देहू देवस्थान संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तममहाराज मोरे, पालखी सोहळाप्रमुख विशालमहाराज मोरे, माणिकमहाराज मोरे, विश्वस्त संजयमहाराज मोरे, देहूच्या मुख्याधिकारी निवेदिता घार्गे, नगराध्यक्षा पूजा दिवटे, कार्यालयीन अधीक्षक रामराव खरात, बांधकाम अभियंता संघपाल गायकवाड, नगरसेवक प्रवीण काळोखे, योगेश काळोखे, प्रवीण काळोखे, तलाठी अतुल गित्ते, सूर्यकांत काळे आदी उपस्थित होते. या वेळी जिल्हाधिकारी दिवसे बोलत होते.

संरक्षण विभागाच्या अधिकार्यांशी चर्चा करणार

पुणे-मुंबई महामार्गालगत देहूरोड ते निगडीदरम्यान देहूफाटा ते देहूगाव पाच ते सहा किलोमीटरचा रस्ता हा पूर्वीपासून पालखी मार्ग म्हणून ओळखला जातो. परंतु, या ठिकाणी संरक्षण विभागाचे अधिकारी बॅरिकेड्स लावून जड वाहनांना प्रवेश बंदी करत आहेत. या आठवड्यात दोन वेळा लोखंडी कमान उभी करण्याचा प्रयत्न स्थानिक नागरिकांनी हाणून पडला. या संदर्भात ग्रामस्थांनी जिल्हाधिकार्यांना यातून मार्ग काढण्याची मागणी केली.

देहू नगरपंचायतीने आराखडा तयार करावा

देहूगावातील समस्या वेगळ्या आहेत. परंतु, यात्रा आणि पालखी प्रस्थान सोहळ्यातील समस्या वेगळ्या आहेत. पालखी प्रस्थान सोहळ्यादरम्यान काय काय समस्या निर्माण होतात त्याची माहिती घ्यावी आणि त्याप्रमाणे आराखडा तयार करावा, अशा सूचना नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांना जिल्हाधिकारी दिवसे यांनी दिल्या आहेत. इंद्रायणीचा घाट स्वच्छ केला म्हणजे प्रश्न सुटला असे नाही. तर, या भागातील सांडपाणी इंद्रायणी नदीत जात आहे. त्यामुळे पाणी दूषित होऊन जलपर्णी वाढत आहे. त्यासाठी पाणी शुद्धीकरण (एसटीपी) केंद्र निमार्ण करणे आवश्यक आहे. यासाठी नगरपंचायतीने लवकरात लवकर कार्यवाही करावी, असेही जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी सूचना दिल्या.